116

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# शासकीय आश्रमशाळेला शिक्षण विभागाचे अधिकारी वैद्यकिय अधिकारी व इतर तपासणी अधिकारी यांनी दिलेल्या भेटींचा मूल्यमापन अहवाल

...

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,
28, क्वीन्स गार्डन, पुणे 411 001

1994

## प्रस्तावना

--------

कोणत्याही अविकसित देशाच्या विकसनशील प्रक्रियेत शिक्षणास अनन्यसाधारण महत्व आहे. जोपर्यंत सर्व समाज सुशिक्षित व सुसंस्कृत होत नाही, तोपर्यंत कल्याणकारी राज्याची संकल्पना अस्तित्वात येणे केवळ अवघडच नाहीतर अशक्यप्राय वाटते. म्हणूनच स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्या देशात शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात सुरू झाल्याचे दिसून येते. सुरवातीचे काळात जमेल त्याप्रमाणे शिक्षणाचा प्रसार व्हावा व शिक्षणाची टक्केवारी वाढावी याकडे प्रामुख्याने भर देण्यात आला. पण कालांतराने असे लक्षात आले की, मागासलेल्या जमाती व आदिवासी जमाती यांच्यात शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे व त्यात तातडीने सुधारणा करण्याची गरज राज्यकर्त्यांना व शिक्षण तज्ञांच्या लक्षात आली व त्यानुसार मागासलेल्या जमातीमध्ये विशेषतः आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने अनेक पावले उचलली गेली. मुख्यतः महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमाती या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या आहेतच. परंतू त्याचबरोबर त्या एका विशिष्ट भौगोलिक भागात, घनदाट जंगलात व डोंगराळ प्रदेशात राहत असल्याने व बाह्य जगाशी फार संपर्क नसल्यामुळे त्यांच्यात प्रचलित पध्दतीने शिक्षणाचा प्रसार होणे अवघड होते. त्यासाठी निराळया योजना तयार करण्याची गरज राज्यकर्त्यांच्या व शिक्षण तज्ञांच्या लक्षात आली. आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण जास्त नसल्यामुळे त्यांच्या मुलामुलींमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी व त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक झळ सहन करावी लागू नये यासाठी बराच विचार केल्यानंतर शासनाने आश्रमशाळांच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्यास बहुतेक मुले-मुली शिक्षणासाठी पुढे येऊन शकतील व त्यायोगे आदिवासी विकास होण्यास मदत होईल, अशाप्रकारची संकल्पना पुढे आली. त्यानुसार 1972 सालापासून आश्रमशाळातून आदिवासी मुलांना शिक्षण देण्यास सुरवात झाली. त्यासुमारास आश्रमशाळेची संकल्पना काही स्वयंसेवी संस्था निरनिराळया भागात सुरू केल्याचे आपणास दिसून येईल. त्यानंतर असे लक्षात आले की, आदिवासी मुला-मुलींना फक्त शिक्षण मोफत देऊन भागणार नाही तर त्यांचा राहण्याच्या/जेवणाच्या खर्चाची सोय सुध्दा शासनाने केली तरच आदिवासी मुले-मुली मोठया संख्येने शिक्षणासाठी पुढे येतील. हा विचार लक्षात घेऊन आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. 1972 सालापासून आश्रमशाळांना प्रशिक्षित शिक्षक वर्ग, आदिवासी मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह व्यवस्था, त्यांच्या जेवणाची सोय व अनुषंगिक खर्चासाठी काही विशिष्ट रक्कम इ.सोयी सवलती शासनाने दिल्या व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा तत्कालीन परिस्थितीनुरुप शासनाने केल्या.

सध्या अशाप्रकारच्या शासकीय आश्रमशाळा राज्यात एकूण 406 असून स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या व शासकीय अनुदानावर अवलंबून असलेल्या एकूण 253 आश्रमशाळा आहेत. या आश्रमशाळांवर देखरेख, शिक्षण खात्याचे व आरोग्य खात्याचे अधिकारी ठरलेल्या नियमानुसार करीत असतात. तसेच आदिवासी विभागामार्फत आदिवासी विकास विभागाचे कर्मचारी आश्रमशाळांना वेळोवेळी भेटी देऊन इतर बाबींची तपासणी करून त्याप्रमाणे सुधारणा सुचवत असतात व त्याप्रमाणे आपला अहवाल सादर करीत असतात. सध्या शासकीय शासकीय आश्रमशाळांमध्ये 1992 अखेर 1,13,619 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या व्यतिरिक्त शासनाने चालविलेल्या अशा 101 मुलींची

वसतीगृह व 48 मुलींची वसतीगृह निरनिराळ्या भागात कार्यरत आहे. या वसतीगृहामध्ये 5875 मुले व 2373 मुली राहत असून निरनिराळ्या प्रकारचे शिक्षण प्राथमिक शिक्षण ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळा बहुतांशी आदिवासी मुलांच्या सोईचे दृष्टीने आदिवासी भागातच सुरू करण्यात आलेल्या आहेत. पुष्कळश्या आश्रमशाळा या जिल्हयाच्या/तालुक्याच्या गांवापासून ब-याच लांब अंतरावर असल्याचे आपणास दिसून येते. अशाठिकाणी वैद्यकिय सोयी सवलती विशेष प्रमाणात उपलब्ध नसतात. वैद्यकिय सोयी उपलब्ध करून देणे हे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्वाचे ठरते. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी व आरोग्यविषयक मार्गदर्शन वेळोवेळी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रावरील व ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकिय अधिकारी व त्यांच्या हाताखाली असलेल्या कर्मचारी वर्गांनी करावयाचे आहे. तसेच जिल्हा परिषदेतील शिक्षण खात्यातर्फे व वरिष्ठ जिल्हा आरोग्य अधिका-यातर्फे त्यांच्या नियमित भेटीचा कार्यक्रम जरी ठरवून दिला असला तरी अशा भेटी व आरोग्य व शिक्षण विषयक तपासणी व्यवस्थित होते की नाही हे पाहणे महत्वाचे ठरते. कारण आदिवासी भागातील मुले ही बहुतांशी कुपोषण व अंधश्रध्दामुळे अनेक रोगास बळी पडण्याची शक्यता वारंवार असते. त्यादृष्टीने वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचा-यांनी त्यांच्या आरोग्यविषयक तपासणी आश्रमशाळांत जाऊन करणे व त्याप्रमाणे योग्य ती उपाययोजना करणे, त्यांना औषधे पुरविणे इ. बाबी न चुकता करणे अतिशय महत्वाचे ठरते.

परंतू शिक्षण खात्यातील वाढत्या कामामुळे तसेच वैद्यकिय अधिका-यांच्या अनेक जागा रिक्त असल्यामुळे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामीण रूग्णालयामध्ये येणारे रूग्ण जास्त संख्येने असल्यामुळे शिक्षण अधिकारी/वैद्यकिय अधिका-यांच्या आश्रमशाळांना होणा-या भेटी या अतिशय अनियमित झाल्याचे दिसून येते. त्याची कारणे कदाचित वेगळीवेगळी असू शकतील. परंतू या बाबीचा गंभीर असा परिणाम आश्रमशाळांच्या शिक्षणाच्या गरजेवर व विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर निश्चितपणे होतो, असे स्पष्टपणे दिसून येईल.

उपरोक्त बाबी प्रकर्षाने टाळण्यात हा मूळ उद्देश ध्यानी घेऊन त्यादृष्टीने सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणेने "शासकीय आश्रमशाळांना वैद्यकियअधिकारी/शिक्षण विभागाचे अधिकारी व इतर तपासणी अधिकारी यांनी दिलेल्या भेटीच्या मूल्यमापनाचा अहवाल" तयार करण्याचे काम पूर्ण केले आहे. सदर अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील श्री. व. पं. देवळे, संशोधन अधिकारी व श्री. आय. आर. तडवी, अन्वेषक, यांनी केले आहे.

शिक्षण क्षेत्रात व वैद्यकिय क्षेत्रात काम करणारे अधिकारी व इतर कर्मचारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी व आदिवासी विकास विभागात काम करणारे संबंधित प्रकल्प अधिकारी, सहा. प्रकल्प अधिकारी तसेच अपर आयुक्त व इतर अधिका-यांना हा अभ्यास अहवाल मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल, अशी मला खात्री आहे.

पुणे
दि. 12.9.94

(डॉ. नवीनचंद्र जैन)
संचालक

शासकीय आश्रमशाळेला शिक्षण विभागाचे अधिकारी व वैद्यकिय अधिकारी व इतर तपासणी अधिकारी यांनी दिलेल्या भेटींचा मूल्यमापन अहवाल

# अ नु क्र म णि का


| अ.क्र | प्रकरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| 1. | प्रास्ताविक | 1 ते 9 |
| 2. | अभ्यास अहवालाबाबतचे मूळ उद्देश व त्यावरील विवेचन | 11 ते 17 |
| 3. | सर्वेक्षणाच्या आकडेवारीचे संकलन व विवेचन | 19 ते 79 |
| 4. | क्षेत्रीय पाहणी | 81 ते 95 |
| 5. | विविध सूचना व त्यावर आधारीत निष्कर्ष व समारोप | 97 ते 105 |
| | ..... | |
| 1. | परीशिष्ट -1 : प्रपत्र-1<br>शासकीय आश्रमशाळेत वैद्यकिय अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी दिलेल्या भेटी-बद्दल मूल्यमापन पाहणी-<br>मुख्याध्यापकांनी भरावयाचे प्रपत्र | 107 ते 129 |
| 2. | परीशिष्ट -2 : प्रपत्र क्र.2<br>शासकीय आश्रमशाळेस वैद्यकिय अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी दिलेलया भेटीचे मूल्यमापन- 1991-92 वैद्यकिय अधिका-यांच्या अभिप्रायार्थ प्रश्नावली<br>{विचारधारा} | 131 ते 133 |
| 3. | परीशिष्ट 3 : प्रपत्र क्र.3<br>शासकीय आश्रमशाळेस वैद्यकिय अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी दिलेल्या भेटीबद्दल मूल्यमापन पाहणी - शिक्षण विभागाच्या अभिप्रायार्थ प्रश्नावली<br>{विचारधारा} | 135 ते 137 |

# प्रकरण 1 ले

## प्रास्ताविक

1·1 अनेक वर्षापूर्वी म्हणजे इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत भारतात प्रचलित असलेल्या शिक्षण पध्दतीत "गुरुकुल" ही संस्था फार प्रभावी होती· आश्रमीय व्यवस्थेखाली गावांतील पुरोहिताकडे बालवयीन छात्र अध्ययन करीत· गुरुंचे सानिध्यात राहून शिक्षण घेत· हे शिक्षण तत्कालीन प्रचलित शिक्षण पध्दतीप्रमाणे असे· तेथे राहून छात्रांना निरनिराळ्या व्यावहारिक ज्ञानाचे आणि व्यवसायांचे शिक्षण मिळे· त्याचबरोबर भारतीय संस्कृती, ज्ञान, नीतीमत्ता यांचेही शिक्षण मिळून समाजाची बौध्दिक व नैतिक पातळी उंच करण्यामध्ये या आश्रमीय जीवन पध्दतीचा सामाजिक दृष्टीकोनातून समाजास लाभ होई·

1·2 कालांतराने भारतावरील विविध परकीय आक्रमणांचा परिणाम म्हणून ही "गुरुकुल" संस्था लयास गेली· देशातील अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक वस्तूंचा नाश झाला· नवीन शैक्षणिक, सांस्कृतिक कालखंडास सुरुवात झाली· परकीयांच्या राजकीय प्रभावामुळे अरबी, पारशी भाषातील वाङ·मय समाजापुढे येऊ लागले· जुन्या संस्कारमय पध्दतींचा परकीय सत्तेमुळे लोप होऊ लागला व त्यातच इसवी सनाच्या अकराव्या शतकाच्या सुमारास "गुरुकुल" पध्दत लयास गेली·

1·3 गुरुकुल पध्दत जरी लयास गेली तरी अनेक कारणांनी त्या संस्थेच्या कार्याची छाप समाज बाजूस सारू शकला नाही· कारण याच पध्दतीमुळे छात्रांना शैक्षणिक, मानसिक, सामाजिक व व्यवहारी दृष्टीकोनामधून ज्ञान मिळाले· याच गुरुकुल आश्रमीय पध्दतीतून त्या काळी नालंदा, वल्लभी, कांची या ठिकाणी विद्यापीठांची स्थापना होऊन देशातील व परदेशातील छात्रांनी शिक्षण घेतले· भारत देशात या विद्यापीठातून प्राचीन काळी तांत्रिकी शास्त्रात शिक्षण दिले जात असे, असे इतिहास सांगतो· छात्रांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांना व्यसनापासून, अवगुणांपासून अलिप्त करण्याचे दृष्टीने "आश्रमीय" पध्दतीने मोलाचे कार्य केलेले आहे·

1·4 अशा कर्तबगार ऐतिहासिक पध्दतीची पार्श्वभूमी लक्षात घेऊन महाराष्ट्रात आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा सुरु केलेल्या आहेत· आश्रमशाळा म्हणजे संस्कारमय शाळा· इतर शाळांपासून या शाळांची ध्येय-धोरणे भिन्न आहेत· या निवासी शाळा असल्यामुळे शिक्षण खात्याने नियोजित करुन दिलेली शिक्षण पध्दती तर या शाळांमधून राबवावयाची आहेच, परंतु सर्व निवासी छात्र संस्कारमय कसे बनतील याकडेही तेथील गुरुजनांना काळजीपूर्वक पहायचे आहे व त्याप्रमाणे त्यांना कार्य करावयाचे आहे·

**शिक्षणाचा मागील आढावा :**

1•5 ब्रिटेश अंमलामध्ये ब्रिटेशांनी सन 1765 पासून शिक्षण क्षेत्र हाती घेतले• इंग्रजी शिक्षण प्रसाराचे कार्य प्रामुख्याने मिशनरी संघटकांनी केले• मिशनरी शाळेत शिकणा-यांना इंग्रज सरकारच्या निरनिराळ्या खात्यात पगारी नोक-या मिळू लागल्यामुळे या पध्दतीने चांगलाच जोर धरलेला होता•

1•6 हिन्दी लोकांना पाश्चात्य शास्त्रे व कला यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच देणे कसे जरूरीचे आहे, महत्वाचे आहे हे ब्रिटेश पार्लमेंटला पटवून देण्याची मोठी जबाबदारी मेकॉले यांनी केली• न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी यांना शिक्षणाचे महत्व पटले होते• आपआपल्या परीने ते शिक्षणाच्या योजना ब्रिटेश शासनापुढे मांडत होते• नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी भारतातील 14 वर्षांचे आतील सर्व मुलामुलींना सक्तीचे एतद्देशीय मोफत शिक्षण घ्यावे म्हणून चळवळ सुरु केली• पण भारतासारख्या विशाल देशात शिक्षणासाठी एवढा पैसा खर्च करणे महागडे होईल म्हणून त्याला मंजुरी देण्यात आली नाही• पण शिक्षणाची चळवळ थांबली नाही, उलट ती जोर धरू लागली• परिणामी ब्रिटेश शासनास या योजनेवर शिफारस करण्यासाठी सर जॉन सार्जन्ट यांचे अध्यक्षतेखाली सन 1944 साली एक समिती नेमावी लागली• या समितीने 6 ते 13 वयोगटातील सर्व मुलामुलींना सक्तीचे ‖ ‖ मोफत शिक्षण देण्याविषयी शिफारस केली• पुढे सन 1947 साली भारत स्वतंत्र झाला• घटनाकारांनी संविधानाच्या 45 व्या कलमानुसार 26 जानेवारी, 1950 पासून दहा वर्षांच्या आंत राज्यातील सर्व बालकांना 14 व्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण मोफत करण्यात यावे असा आदेश दिला•

**आदिवासींची तत्कालीन शैक्षणिक स्थिती :**

1•7 या नंतरच्या काळात शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने निरनिराळी राष्ट्रीय व राज्य पातळीवर कमिशन्स नेमली गेली• शिक्षणाच्या विविध स्तरात विविध योजना कार्यान्वित होऊ लागल्या• लोक साक्षर, शिक्षित, सुशिक्षित बनू लागले• शिक्षणाची टक्केवारी मंद गतीने कां होईना पण वाढीस लागली• परंतु निसर्गाशी रममाण झालेल्या, अत्यंत दुर्गम, बिकट, दलदलीच्या डोंगर पायथ्याशी द-याखो-यातून वस्ती करून राहिलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांना कुठल्याही शिक्षण योजनांचा पुरेसा लाभ मिळू शकला नाही• ही परिस्थिती भारतातील सर्वच आदिवासींच्या वाट्याला कमीअधिक प्रामाणात आलेली होती• भारतातील कुठल्याही भागामध्ये आदिवासींचे शिक्षण टक्केवारीचे प्रमाण हे 10 टक्क्याहून अधिक नव्हते• महाराष्ट्रात तर आश्रमशाळा पध्दत सुरु होण्यापूर्वी शिक्षण प्रामाण नगण्यच होते• मुलींच्या बाबतीत ही स्थिती तर फारच शोचनीय होती• आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने अगदी प्रयत्न झालेच नव्हते असे नाही परंतु ज्या ठिकाणी आदिवासींची वस्ती आहे तो भाग

अत्यंत दुर्गम प्रदेश होता, दळणवळणाची काहीच सोय नव्हती, बहुजन आदिवासी समाजामध्ये शिक्षणाबद्दल आस्था नव्हती. मुलांना शिक्षण देण्यापेक्षा त्यांच्या कष्टाची उपयुक्तता त्यांच्या संसारात अधिक उपयुक्त वाटत होती. मुलींच्या शिक्षणाला पारंपारिक विरोध होता. या व अशाच अनेक कारणांनी आदिवासी लोकांत शिक्षणाचे मूळ रुजू शकले नाही.

**आदिवासी क्षेत्रात झालेले शिक्षण प्रसाराबाबतचे प्रयत्न :**

1.8 स्वातंत्र्यपूर्व काळातही आदिवासींचे शिक्षणासाठी काही प्रयत्न झालेले दिसतात. ख्रिस्ती मिशन-यांकडून इसवी सन 1920 मध्ये ठाणे जिल्हयातील पालघर, डहाणू व उंबरगांव येथे प्राथमिक शाळा उघडल्या, पण अनेक कारणांनी त्या शाळांनी प्रगती केली नाही. नंतरच्या काळात मिस लेथमची भिल्ल सेवा मंडळ, शंकरराव ठकार यांचे पश्चिम खानदेश सेवा मंडळ, बाबासाहेब दांडेकर व आचार्य भिसे यांचे आदिवासी सेवा मंडळ, दादासाहेब बिडकर यांचे डांग सेवा मंडळ, डॉ.ए.के.मोरे यांचे आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ, श्री.भाऊसाहेब हिरे यांची आदिवासी सेवा समिती, पूजनीय ठक्कर बाप्पा यांची देशव्यापी आदिम जाती सेवा संघ अशा अनेक संस्थांनी व व्यक्तींनी आदिवासींच्या विकासासाठी शिक्षण हे मध्यवर्ती सूत्र कल्पून सेवा कार्य केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात आणखीही काही प्रयत्न झालेले दिसतात. आदिवासींच्या विकासाबाबत विचार करण्यासाठी सेमिंग्टन समितीची स्थापना झालेली होती. इसवी सन 1938 साली सेमिंग्टनने आपला अहवाल ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे सादर केला, त्यात आदिवासींच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा काढण्यात याव्यात व आदिवासींचे बाबतीत सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करण्यात यावे अशा महत्वाच्या शैक्षणिक शिफारसी केल्या होत्या.

1.9 त्यानंतर इसवी सन 1942 साली नेमण्यात आलेल्या मॅकमिलन समितीने शेती, आरोग्य, शैक्षणिक विषयात महत्वाच्या शिफारसी केलेल्या होत्याच परंतु मागास जमातींसाठी खास वेगळा निधी ठेवण्यात यावा ही महत्वाची शिफारस केलेली होती.

1.10 स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन 1947 साली बांद्रेकर यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासींच्या विकासाबद्दल विचार करण्यासाठी एक समिती नेमली गेली. आचार्य भिसे हे या समितीचे एक सदस्य होते. ठाणे जिल्हयातील आदिवासींचा विशेष अभ्यास करून या समितीने खालील सूचनांची पूर्तता व्हावी असे प्रतिपादन केले.

1) आदिवासी क्षेत्रात सक्तीचे प्राथमिक शिक्षण असावे.
2) दर 10 प्राथमिक शाळेत एक मध्यवर्ती शाळा असावी.
3) आश्रमशाळेला जोडून वसतिगृहाची व्यवस्था असावी.
4) पुस्तकी शिक्षणाबरोबर शेती शिक्षणाची व्यवस्था असावी.

5) आश्रमशाळांना स्वतंत्र इमारती असाव्यात. शिक्षकांसाठी निवासस्थाने बांधावित.

1.11 या सर्व सूचना तत्कालीन मुंबई राज्य सरकारने स्विकारल्या व त्या धर्तीवर काही शाळा ठाणे जिल्हयातील त्या वेळेच्या उंबरगांव तालुक्यात सन 1949 साली उघडल्या. आचार्य भिसे यांच्या सूचनेनुसार 1954 साली जव्हार तालुक्यातील तलवडे या ठिकाणी पहिली आश्रमशाळा उघडण्यात आली.

**आश्रमशाळेचा नवीन दृष्टीकोन :**

1.12 अद्याप पर्यंत व्यक्तीच्या विकासासाठी "व्यक्ती" ही विकास योजनांचा केंद्रबिंदू समजून योजनेचा एक विकासक्रम ठरविण्यात आला होता व त्या दृष्टीने पहिल्या पाच पंचवार्षिक योजना याच धर्तीवर राबविण्यात आल्या व आदिवासींचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु "व्यक्ती" हा केंद्रबिंदू मानून विकास योजना परिणामकारक होऊ शकलेली नाही हे दिसून आल्यानंतर त्या व्यक्तीचा परिसरच बदलणे आवश्यक आहे हे धोरण शासनाने स्विकारले. क्षेत्र विकासामुळे त्या व्यक्तीचाही विकास होईल असे मानण्यात आले, व त्या दृष्टीने आदिवासींचा वास्तव्याचा डोंगराळ, दुर्गम भाग हा योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आला. शिक्षणाच्या माध्यमातून एकत्रित क्षेत्र विकास व त्यातून आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. आश्रमशाळेतून पुस्तकी ज्ञानच किंवा साक्षरता वाढविणे हा केवळ एकच हेतू त्यात धरला जाणार नाही. तर शेती, दुग्धपालन, लहान उद्योगधंदे अशा प्रकारचे काही खास प्रशिक्षणही यात देण्यात येईल. "शिक्षणातून परिसर विकास या कल्पनेस शिक्षणद्वारा समाज शिक्षण व समाज शिक्षणद्वारा समूह विकास व मानव विकास असा विशाल दृष्टीकोन या योजनेत समाविष्ट केलेला आहे." अशा प्रकारच्या शिक्षण प्रशिक्षणातून समाजाचे सामान्य ज्ञान, विशिष्ट दृष्टीकोन, कौशल्य यांची वाढ होऊन मानव व त्याचबरोबर संबंधित साधन सामुग्रीचा विकास करून आदिवासींचो शैक्षणिक स्थिती भक्कम करणे हे या कल्पनेमागील उद्दिष्ट आहे. या प्रक्रियेत मुले, पुरुष व स्त्रिया या सर्वांचा विकास अपेक्षित आहे.

**आश्रमशाळेची मूलभूत योजना :**

1.13 शिक्षणाच्या माध्यमातून क्षेत्र विकास या प्रक्रियेत आश्रमशाळा ही एक महत्वाची योजना आहे. या शाळातून आदिवासी मुलामुलींची 1 ते 7 इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय करण्यात येत आहे. सातवीनंतर आवश्यक ठिकाणी माध्यमिक शाळेत त्यांचे रूपांतर केले जाते. महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण व सांस्कृतिक विभागातर्फे शासन निर्णय क्रमांक:बीसीपी-1072/13893-जी, दिनांक 14-8-1972 नुसार आश्रमशाळा समूहांची योजना मंजूर करण्यात आली. आश्रमशाळा हा एक विकास केंद्राचा भाग असून साधारणतः 5000 ते

7000 लोकवस्तीचा परिसर एका आश्रमशाळेच्या कक्षेत येतो. आश्रमीय छात्रांना वसतिगृहाची सोय होऊन निवास, भोजन याची मोफत सोय करण्यात येते. आश्रमशाळा बरोबरच बालवाडी, शेती मार्गदर्शन केंद्र, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, आरोग्य केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र स्थापन करण्यात यावीत असे आदेश होते. असे करण्याने आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्यास मदत होईल. ही त्या मागील कल्पना होती.

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे या संस्थेचा सहभाग :

1.14 आदिवासी क्षेत्रातील कोणत्याही कल्याणकारी योजना फलद्रूप होण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे सहाय्य करते. ही योजना राबवित नाही पण योजना राबविण्याच्या प्रक्रियेत शक्य असेल ते सर्व सहाय्य करते.

1.15 आश्रमशाळेचे मूल्यमापन या संस्थेने केले होते त्या वेळी ही योजना समाधानकारकरित्या राबविली जात नाही असे या संस्थेच्या दृष्टोत्पत्तीस आले. या योजनेचा हेतू, उद्दिष्ट, कार्य करण्याची पध्दत, व्यवस्थापन या गोष्टींचे सम्यक ज्ञान जोपर्यंत कर्मचारी वर्गास होत नाही तोपर्यंत या योजनेत परिणामकारकरित्या बदल घडून येणे अशक्य आहे असे वाटल्यावरुन या संस्थेने मे, 1982 पासून आश्रमशाळेतील महत्वाचे कर्मचारी व घटक (1) मुख्याध्यापक व (2) वसतिगृह अधीक्षक यांच्यासाठी याच संस्थेच्या परिसरांत प्रशिक्षण वर्ग प्रत्येकी 15 दिवसांचा या प्रमाणे आयोजित केले. या कमीत कमी प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना नित्योपयोगी ठरणारे व परिणामी प्रगतीकडे नेणारे ज्ञान संस्थेतील व संस्थे बाहेरील तज्ञ लोकांकडून दिले जाते. कार्याची इति कर्तव्यता योग्य दिशेने व्हावी, मुले शिक्षित, सुशिक्षित व सुसंस्कृत व्हावीत यासाठी काही ध्येय, धोरणे आखावीत, व्यवस्थापन कसे असावे या विषयी अल्प काळात मोलाचे ज्ञान देण्यात येते.

1.16 1954-55 ते 1989-90 या कालावधीमध्ये आश्रमशाळांची भरीव प्रगती होत गेली. आश्रमशाळेच्या कामकाजावर विविध सर्व्हेक्षणेही घेण्यात आली. सन 1991-92 मध्ये संस्थेने हे विविध अंगी सर्व्हेक्षण हाती घेतले आहे. खालील तीन विषयामधून हे सर्व्हेक्षण घेण्यात आले आहे.

1) शासकीय आश्रमशाळांची विद्यार्थ्यांची गळती बाबत पाहणी व त्यावर सुचविण्यात येणारे उपाय.

2) आश्रमशाळांमध्ये असलेल्या विविध सेवा सुविधांची पाहणी व

3) शिक्षण विभागाच्या अधिका-याची, वैद्यकीय अधिका-यांची व इतर तपासणी अधिका-यांची आश्रमशाळांना द्यावयाच्या भेटी बाबतची पाहणी.

पुढील प्रकरणांमध्ये सर्व्हेक्षणाच्या मूळ उद्देशाबाबतचा विचार करुया.

## प्रकरण 2 रे

## अभ्यास अहवाला बाबतचे मूळ उद्देश व त्यावरील विवेचन

2·1 आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रमशाळा सुरू करणे, त्यांचा विकास करणे, अनुदान देणे या बाबी आदिवासी कल्याण विभागाकडे आहेत· परंतु, त्या शाळांची शैक्षणिक तपासणी व शैक्षणिक नियंत्रण हे शिक्षण खात्याकडे आहे· आश्रम शाळांची शैक्षणिक तथा प्रशासकीय तपासणी अनेक अडचणींमुळे नियमितपणे होत नाही याचा परिणाम म्हणून त्या शाळांची प्रगती अपेक्षेप्रमाणे होत नाही· अतिमागास व दुर्गम भागातील मागासवर्गीय व आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज भागविण्यासाठी आश्रमशाळा कार्यरत आहेत· शिक्षण खात्याकडे या कामाची जबाबदारी असल्याने या बाबत तपासणी अधिका-यांनी जाणीवपूर्वक या शाळा संबंधीची कर्तव्ये पार पाडली पाहिजेत· आश्रमशाळेची प्रशासकीय तपासणी आदिवासी कल्याण अधिकारी व त्यांचे निरीक्षक करतात· ही तपासणी मुख्यतः बिगर शैक्षणिक बाबींची होते· शैक्षणिक बाबींची तपासणी शिक्षणाधिकारी किंवा शिक्षण विभागाचे अन्य अधिकारी करतात· शिक्षण खात्याचा तपासणी अहवाल नमुना तक्त्यात प्रतिवर्षी शासनाकडे पाठविला जातो· तालुका पातळीवर भाग शिक्षणाधिकारी किंवा शिक्षण विस्तार अधिकारी यांनी तालुक्यातील प्रत्येक आश्रमशाळेची शैक्षणिक तपासणी करून अहवाल आदिवासी कल्याण अधिका-याच्या कार्यालयाकडे पाठविला पाहिजे· भाग शिक्षणाधिकारी शाळेवर न आल्यास मुख्याध्यापकांनी त्यांच्याशी संपर्क साधून शाळेची तपासणी करून घेणे आवश्यक आहे·

2·2 आश्रमशाळेतील मुलांच्या आरोग्याचीही वर्षातून दोन वेळा तपासणी करावी असे शासनाचे आदेश आहेत· आश्रमशाळे जवळील आरोग्य केंद्राच्या डॉक्टरने किंवा जिल्हा आरोग्य अधिका-याने हे काम करावयाचे आहे·

2·3 उपरोक्त बाबींचा विचार करून या संस्थेतर्फे शिक्षणाधिकारी व वैद्यकीय अधिकारी आश्रमशाळेस नियमितपणे भेटी देतात काय ? व शाळेची वैद्यकिय व शैक्षणिक तपासणी करतात काय ? या बाबतचे मुल्यांकन अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे·

2·4 अभ्यास अहवालाची मूळ उद्दिष्ट खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत·

1) आश्रमशाळांना शिक्षण व वैद्यकीय विभागाचे अधिकारी भेटी देतात काय ? या बाबतचा अभ्यास करणे·

2) भेटी दिल्या असल्यास त्यांनी दिलेल्या शे-यांचे (अभिप्रायांचे) अवलोकन करणे व त्यात सुधारणा करण्यासाठी उपाय योजना सुचविणे·

3) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी व शिक्षणातील दर्जा सुधारणे साठी काही उपाय योजना सुचविणे·

2·5 वरील उद्दिष्टांची परिपूर्तता करण्यासाठी व ह्या पाहणीचा विषय मर्यादित स्वरूपाचा असल्यामुळे सह्याद्री विभागातील 65 व गोंडवन विभागातील 59 आश्रमशाळांची निवड करण्यात आली· ह्या आश्रमशाळांची निवड रॅण्डम पध्दतीप्रमाणे व सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यातून एक आश्रमशाळा सर्व्हेक्षणासाठी निवडण्यात आली आहे·

2·6 निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या खालील तक्त्यामध्ये आदिवासी विकास अधिकारी यांच्या कक्षे अंतर्गतची दर्शविण्यात आली आहे·

तक्ता - 2·1

आदिवासी विकास अधिकारी कार्यालय निहाय निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या दर्शविणारा तक्ता·

| अ·क्र· | आदिवासी विकास अधिकारी यांचे कार्यालय | निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | **1· सह्याद्री विभाग** | |
| 1· | ठाणे | 9 |
| 2· | डहाणू | 5 |
| 3· | शहापूर | 5 |
| 4· | कळवण | 6 |
| 5· | नासिक | 7 |
| 6· | तळोदा | 6 |
| 7· | नंदूरबार | 5 |
| 8· | जळगांव | 7 |
| 9· | राजूर | 3 |
| 10· | पुणे | 9 |
| 11· | औरंगाबाद | 3 |
| | एकूण | 65 |
| | **2· गोंडवन विभाग** | |
| 12· | नागपूर | 8 |
| 13· | अमरावती | 4 |

| | | |
|---|---|---|
| 14. | अकोला | 5 |
| 15. | यवतमाळ | 11 |
| 16. | नांदेड | 3 |
| 17. | गोंदिया | 5 |
| 18. | अहेरी | 3 |
| 19. | गडचिरोली | 5 |
| 20. | चंद्रपूर | 6 |
| | एकूण | 50 |

2.7 संदर्भ वर्ष : पाहणीसाठी संदर्भ वर्ष 1989-90 हे ठरविण्यात आले आहे. तथापि, काही बाबींची माहिती 1986 ते 1990 या कालावधीची प्राप्त करण्याविषयी ठरविण्यात आले आहे.

पाहणीसाठी आवश्यक असणारी प्रपत्रे :

प्रपत्र क्र.1 :

2.8 प्रपत्र क्र. 1 मधून मुख्याध्यापकाकडून माहिती मागविण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे 115 आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्रपत्र क्र. 1 मध्ये माहिती मागविण्यात आली होती. या प्रपत्रामध्ये आश्रमशाळेची सर्वसाधारण माहिती, शिक्षणाधिकारी, भाग शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या भेटी व त्यांचे अभिप्राय, अभिप्रायावर झालेली कार्यवाही आदिवासी विकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी व इतर अधिकारी यांनी आश्रमशाळेस दिलेल्या भेटी, त्यांचे अभिप्राय इत्यादी. वैद्यकीय अधिकारी व इतर वैद्यकीय कर्मचारी (Para Medical Personnel) यांनी आश्रमशाळेस दिलेल्या भेटी, त्यांचे अभिप्राय व त्यावरील कार्यवाही व इतर काही बाबी बद्दलची माहिती प्राप्त करून घेण्यात आली आहे.

प्रपत्र क्र. 2 :

2.9 हे प्रपत्र वैद्यकीय अधिका-यांच्या अभिप्रायार्थ तयार करण्यात आले आहे. यामध्ये वैद्यकीय अधिका-यांनी आश्रमशाळेस दिलेल्या भेटींची संख्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वसामान्यपणे आढळून येणा-या व्याधी, विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत सूचना व इतर माहिती मागविण्यात आली आहे. हे प्रपत्र वैद्यकीय अधिका-यांची भेट घेऊन प्रत्यक्ष भरण्यात आले आहे.

प्रपत्र क्र• 3 :

2•10 हे प्रपत्र शिक्षण विभागातील अधिका-यांच्या अभिप्रायार्थ तयार करण्यात आले आहे• यामध्ये शिक्षण अधिका-यांनी आश्रमशाळेस दिलेल्या भेटींची संख्या, त्यांच्या भेटीबाबत येणा-या विविध अडचणी, आश्रमशाळेचा दर्जा सुधारण्यासाठी केलेल्या सूचना शिक्षकांना मार्गदर्शक सूचना व क्रिडा विषयक सूचना बाबतची माहिती देण्यात आली आहे•

क्षेत्रिय पाहणी :

2•11 क्षेत्रिय पाहणीच्या संदर्भात प्रत्यक्ष आश्रमशाळांना, गट शिक्षणाधिका-यांना, भाग शिक्षण-अधिका-यांना, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिका-यांना भेटी देऊन त्यांचे अभिप्राय प्रपत्र 2 व 3 मध्ये भरून घेण्याचे निश्चित करण्यात आले होते• या क्षेत्रिय पाहणीसाठी सह्याद्री विभागातील पुणे, नासिक, नगर व गोंडवन विभागातील अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला• दुर्गम भागातील व अतिदुर्गम भागातील गांवे, तसेच बेसिक व पोस्ट बेसिक आश्रमशाळांची निवड करण्यात आली• त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील कमीत कमी चार तालुके व प्रत्येक तालुक्यातील कमीत कमी एक आश्रमशाळा पाहणीसाठी निवडण्यात आली• उपरोक्त प्रत्येक जिल्ह्यातून कमीत कमी 3 शिक्षणाधिका-यांचे व 3 वैद्यकीय अधिका-यांचे प्रपत्र भरावयाचे ठरविण्यात आले होते• मार्च-एप्रिल 1992 या कालावधीमध्ये क्षेत्रिय पाहणी पूर्ण करण्यात आली आहे•

## प्रकरण 3 रे

## सर्व्हेक्षणाच्या आकडेवारीचे संकलन व विवेचन

3·1 आदिवासी विकास विभागातंर्गत कार्यरत असलेल्या एकूण शासकीय आश्रमशाळांची संख्या महाराष्ट्र राज्यात 387 आहे· त्यापैकी 256 आश्रमशाळा सहयाद्री विभागात व 131 गोंडवन विभागात आहेत· याशिवाय एकूण 163 अनुदानित आश्रमशाळा पैकी 100 सहयाद्री विभागात 63 गोंडवन विभागात आहेत· आदिवासी विकास विभागातर्फे कार्यरत असलेली 117 शासकीय वसतिगृहे असून ती 69 सहयाद्री विभागात व 48 गोंडवन विभागात येतात·

3·2 सर्व्हेक्षणासाठी सहयाद्री विभागातून 65 व गोंडवन विभागातून 50 आश्रमशाळांची निवड करण्यात आली होती· उपरोक्त 115 आश्रमशाळांची माहिती मागविण्यात आली· ही माहिती प्रपत्र क्रमांक 1 मध्ये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून भरुन घेऊन प्रपत्र या संस्थेकडे पाठवावयाचे आहे असे कळविण्यात आले होते· संस्थेने प्रपत्र क्रमांक 1 च्या आधारे खालील तक्त्यांच्या स्वरुपात प्राप्त केलेल्या माहितीचे पृथःक्करण करण्यात आले आहे·

3·3 महाराष्ट्रातील एकूण आश्रमशाळा व सर्व्हेक्षणाच्या माहितीसाठी निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या सोबतच्या तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे·

तक्ता क्र·3·1

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची माहिती व निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या दर्शविणारा तक्ता·

| अ·क्र· | विभाग | एकूण आश्रमशाळांची संख्या (शासकीय व अनुदानित) | सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या शासकीय आश्रमशाळांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1· | सहयाद्री विभाग | 356 | 65 |
| 2· | गोंडवन विभाग | 194 | 50 |
| | महाराष्ट्र एकूण | 550 | 115 |

सह्याद्री विभागातून 65 तर गोंडवन विभागातून 50 आश्रमशाळांची निवड करण्यात आली आहे·

आश्रमशाळांची जिल्हा निहाय प्रास्ताविक माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे·

तक्ता क्र·3·2

आश्रमशाळांची जिल्हानिहाय प्रास्ताविक माहिती दर्शविणारा तक्ता

| अ·क्र· | जिल्हा | एकूण शासकीय आश्रम-शाळांची संख्या §89-90 अखेर§ | सर्व्हे-क्षणासाठी निवड-लेल्या आश्रम शाळांची संख्या | माहिती प्राप्त न झालेल्या आश्रम शाळांची संख्या | माहिती प्राप्त झालेल्या शाळांची माहिती: एकूण विद्यार्थी संख्या | एकूण आश्रमशाळा §संख्या§: सातवी इयत्ते-पर्यंत | एकूण आश्रमशाळा §संख्या§: दहावी इयत्ते-पर्यंत | निवडलेल्या व माहिती प्राप्त झालेल्या आश्रम-शाळेतील शिक्षकांची संख्या: प्राथमिक | निवडलेल्या व माहिती प्राप्त झालेल्या आश्रम-शाळेतील शिक्षकांची संख्या: माध्यमिक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1· | नाशिक | 62 | 13 | 3 | 3524 | 6 | 4 | 85 | 23 |
| 2· | ठाणे | 64 | 14 | 1 | 4023 | 6 | 7 | 106 | 42 |
| 3· | रायगड | 8 | 4 | 1 | 860 | 2 | 1 | 22 | 4 |
| 4· | रत्नागिरी | 2 | 1 | - | 174 | 1 | - | 8 | - |
| 5· | धुळे | 65 | 11 | - | 3653 | 7 | 4 | 98 | 23 |
| 6· | पुणे | 14 | 4 | 1 | 988 | 1 | 2 | 34 | 8 |
| 7· | कोल्हापूर | 2 | 2 | - | 213 | 1 | 1 | 18 | 4 |
| 8· | सोलापूर | 2 | 2 | - | 265 | 2 | - | 11 | - |
| 9· | सातारा | 2 | 1 | 1 | - | - | - | - | - |
| 10· | अहमदनगर | 15 | 3 | - | 1053 | 2 | 1 | 28 | 5 |
| 11· | जळगांव | 14 | 7 | - | 2304 | 3 | 4 | 57 | 25 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12• | औरंगाबाद | 4 | 2 | - | 682 | 1 | 1 | 19 | 4 |
| 13• | बीड | 2 | 1 | - | 204 | 1 | - | 8 | - |
| एकूण सहयाद्री विभाग | | 256 | 65 | 7 | 17943 | 33 | 25 | 494 | 138 |
| 1• | नागपूर | 6 | 5 | 1 | 1202 | 2 | 2 | 39 | 10 |
| 2• | वर्धा | 5 | 3 | 2 | 265 | - | 1 | 9 | 5 |
| 3• | अमरावती | 16 | 4 | - | 73 | 4 | - | 31 | 5 |
| 4• | अकोला | 2. | 2 | - | 718 | 1 | 1 | 12 | 7 |
| 5• | बुलढाणा | 2 | 3 | - | 851 | 3 | - | 20 | 4 |
| 6• | यवतमाळ | 25 | 11 | 4 | 1775 | 4 | 2 | 54 | 10 |
| 7• | नांदेड | 12 | 2 | 1 | 273 | 1 | - | 8 | -- |
| 8• | परभणी | 4 | 1 | - | 466 | - | 1 | 9 | 5 |
| 9• | भंडारा | 12 | 5 | 1 | 1177 | 3 | 1 | 33 | 10 |
| 10• | गडचिरोली | 35 | 8 | 1 | 2275 | 4 | 3 | 65 | 13 |
| 11• | चंद्रपूर | 12 | 6 | - | 1818 | 5 | 1 | 46 | 5 |
| एकूण गोंडवन विभाग | | 131 | 50 | 10 | 11723 | 27 | 12 | 326 | 74 |
| एकूण सहयाद्री गोंडवन विभाग | | 387 | 115 | 17 | 29666 | 60 | 37 | 820 | 212 |

3•4 वरील जिल्हावार तक्त्यामध्ये दर्शीविल्याप्रमाणे सन 1989-90 अखेर एकूण शासकीय आश्रमशाळांची संख्या 387 आहे• त्यापैकी 115 (30 टक्के) शासकीय आश्रमशाळांची निवड सर्व्हेक्षणासाठी करण्यात आली होती• 115 शासकीय आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्रपत्र क्र• 1 मध्ये माहिती मागविण्यात आली होती• 115 आश्रमशाळांपैकी 17 आश्रमशाळेकडून माहिती प्राप्त झाली नाही• तेव्हां सदरचे संकलन 98 शासकीय आश्रमशाळेच्या माहितीवर आधारित आहे• वरील तक्त्यामध्ये प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे एकूण विद्यार्थी संख्या सातवी व दहावीपर्यंतच्या एकूण आश्रमशाळा व त्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची संख्या दर्शीविण्यात आली आहे•

3•5 प्रपत्र क्र•1 च्या चौक क्र• 2 मध्ये शिक्षणाधिका-यांनी आश्रमशाळेस दिलेल्या भेटींची माहिती संकलित करण्यात आली आहे• ही माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात येत आहे•

तक्ता क्र•3•3

शिक्षणाधिका-यांनी आश्रमशाळेस दिलेल्या भेटींची वर्षवार माहिती दर्शविणारा तक्ता•

| अ•क्र• | विभाग | शिक्षणाधिका-याचा स्तर | सर्वेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळा {संख्या} | त्यापैकी आश्रम शाळांची माहिती प्राप्त झालेल्या शाळांची संख्या | दिलेल्या भेटींची संख्या वर्ष {1988} | वर्ष {1989} | वर्ष {1990} |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1• | सह्याद्री | जिल्हा शिक्षणाधिकारी | 65 | 60 | 2 | 1 | 0 |
| | गोंडवन | | 50 | 38 | 1 | 1 | 0 |
| | | एकूण | 115 | 98 | 3 | 2 | 0 |
| 2• | सह्याद्री | गट शिक्षणाधिकारी | 65 | 60 | 28 | 20 | 24 |
| | गोंडवन | | 50 | 38 | 15 | 13 | 15 |
| | | एकूण | 115 | 98 | 43 | 33 | 39 |
| 3• | सह्याद्री | शिक्षण विस्तार अधिकारी | 65 | 60 | 119 | 153 | 131 |
| | गोंडवन | | 50 | 38 | 50 | 59 | 49 |
| | | एकूण | 115 | 98 | 169 | 212 | 180 |

3•6 उपरोक्त दर्शविलेल्या गट शिक्षणाधिका-यांच्या व शिक्षण विस्तार अधिका-याच्या आश्रमशाळेस सन 1988, 1989 व 1990 या वर्षी दिलेल्या भेटींची आकडेवारी असे दर्शविते की

शिक्षण विस्तार अधिकारी शाळेंना भेटी देण्याबाबत परोपरीने प्रयत्न करतात· तर गट शिक्षणाधिका-यांच्या भेटी समाधानकारक झालेल्या दिसत नाहीत· जिल्हा शिक्षणाधिका-यांच्या आश्रमशाळेस भेटी अत्यल्प व नगण्यच आहेत·

तक्ता क्र·3·4

सन 1991 मध्ये आश्रमशाळांची वार्षिक तपासणी बद्दलची माहिती दर्शविणारा तक्ता·

| अ·क्र· | विभाग सहयाद्री/ गोंडवन | सर्वेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या | त्यापैकी आश्रम शाळांची माहिती प्राप्त झाल्याची संख्या | वार्षिक तपासणी झालेल्या आश्रम शाळा (संख्या) | टक्केवारी (रकाना 5 ची रकाना 4 शी टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1· | सहयाद्री | 65 | 60 | 45 | 75 |
| 2· | गोंडवन | 50 | 38 | 23 | 61 |
| | एकूण | 115 | 98 | 68 | 69 |

3·8 उपरोक्त तक्त्याप्रमाणे आश्रमशाळांच्या वार्षिक तपासणीचे उद्दिष्ट 100 टक्के होणे अपरिहार्य आहे· सन 1991 सालामध्ये हे उद्दिष्ट गाठलेले नाही असे दिसते· फक्त 69 टक्के आश्रमशाळांची वार्षिक तपासणी झालेली आहे·

3·9 आश्रमशाळांची प्रतवारी वार्षिक तपासणीच्या वेळेस शिक्षण विभागाच्या अधिका-यातर्फे करण्यात येते· खालील तक्त्यामध्ये सन 1988, 1989 व 1990 मध्ये प्रतवारी केलेल्या आश्रमशाळांची संख्या दिली आहे· प्रतवारी झालेल्या आश्रमशाळेस अ,ब,क,ड हा दर्जा देण्यात येतो· हा दर्जा शाळेतील सर्व इयत्तेतील निकालांची टक्केवारी, शाळेचे व्यवस्थापन, शाळेची शिस्त, शाळेतील व वसतिगृहामधील स्वच्छता, नियमितपणा, वक्तशीरपणा इत्यादी बाबी तपासून दिला जातो·

तक्ता क्र•3•5

आश्रमशाळांची प्रतवारी विषयक माहिती दर्शविणारा तक्ता•

| अ•क्र• | विभाग सह्याद्री गोंडवन | सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या | त्यापैकी आश्रम शाळांची माहिती प्राप्त झाले-ल्यांची संख्या | वर्षवार प्रतवारींची माहिती (आश्रमशाळांची संख्या) 1988 अ | 1988 ब | 1988 क | 1988 ड | 1989 अ | 1989 ब | 1989 क | 1989 ड | 1990 अ | 1990 ब | 1990 क | 1990 ड | प्रतिवारी एकूण आश्रम शाळा | टक्केवारी (रकाना 17 ची 4शी टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1• | सह्याद्री | 65 | 60 | 2 | 9 | 2 | - | 4 | 7 | 2 | - | 5 | 6 | 2 | - | 13 | 22 |
| 2• | गोंडवन | 50 | 38 | 1 | 6 | 2 | 1 | 1 | 6 | 3 | - | 2 | 6 | 2 | - | 10 | 26 |
| | एकूण | 115 | 98 | 3 | 15 | 4 | 1 | 5 | 13 | 5 | - | 7 | 12 | 4 | - | 23 | 23 |

3•10 वरील तक्त्यावरून हे निदर्शनास येते की, सह्याद्री विभागातील 22 टक्के शाळांची व गोंडवन विभागातील 26 टक्के शाळांची प्रतवारी करण्यात आली आहे• बहुतेक शाळांना "अ" व "ब" दर्जा प्राप्त झाला आहे• राहिलेल्या 77 टक्के शाळांची प्रतवारी करण्यात आलेली नाही असे दिसते• प्रतवारी ज्या आधारे करण्यात येते त्या बाबी विषयीचा ठराविक नमुन्यातील "फॉर्म" राहिलेल्या आश्रमशाळांना उपलब्ध न झाल्यामुळे आश्रमशाळांची प्रतवारी करण्यात आली नाही असे व्यवस्थापनातर्फे सांगण्यात आले आहे•

3•11 शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी त्यांच्या आश्रमशाळा तपासणीच्या वेळेस कांही महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत व त्यावर संबंधित मुख्याध्यापकांनी केलेल्या कार्यवाहीचे वर्षवार त्रोटक विवेचन करण्यात आले आहे•

सन 1988

| शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी शाळा तपासणी वेळेस केलेल्या महत्वाच्या सूचना | मुख्याध्यापकांनी त्यावर केलेली कार्यवाही |
|---|---|
| सह्याद्री विभाग | सह्याद्री विभाग |
| 1• प्रत्येक वर्गात शैक्षणिक तक्ते लावावेत• | |
| 2• शैक्षणिक साधनांचा वापर करावा• | या दोन्ही सूचनांचे अनुपालन केले आहे• |
| 3• प्रत्येक वर्गास स्वतंत्र खोली असावी• | 3• मुख्याध्यापकांनी वरिष्ठांकडे शेडस् {पत्रे} पुरविण्याबाबत मागणी केली आहे• |
| 4• फर्निचर पुरेसे नाही• | 4• आदिवासी विकास अधिकारी यांचेकडे मागणी नोंदविण्यात आली आहे• |
| 5• व्याकरणाची चांगली तयारी करून घेण्यात यावी व 15 निबंध लेखन वर्षभरात घ्यावेत• | 5• अनुपालनाची कार्यवाही करण्यात येत आहे• |
| 6• शाळेचा दर्जा व गुणवत्ता वाढीचे दृष्टीने विशेष प्रयत्न व्हावेत• | 6• शिक्षकांना जादा वर्ग घ्यावयाचे सांगून त्यांची अंमलबजावणी झाली• |
| 7• परिपाठात विविधता असावी• | 7• परिपाठात विविधता आणण्यात आली• म्हणीवरून गोष्टी, प्रश्न विचारण्याचा उपक्रम राबविण्यात आला• |
| 8• विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्या-बाबत सूचना दिल्या• | 8• पालकांची सभा बोलावून त्यात हा विषय विषद करण्यात आला• |
| 9• गणवेष उपक्रम 100 टक्के राबविण्याचा प्रयत्न व्हावा• | 9• त्याप्रमाणे प्रयत्न करण्यात आला• |
| 10• आश्रमशाळा कोळेवाडी, ता• राहुरी जि• अहमदनगर येथील शाळेचे इमारत बांधकाम होणे गरजेचे आहे• | 10• इमारती बांधकामासंबंधी पत्र व्यवहार करण्यात आला• |
| 11• गणित अध्यापनात पध्दतीनुसार अध्यापन करण्याचा प्रयत्न व्हावा• | 11• गणित विषयाचे शिक्षकास तशा सूचना केल्या आहेत• |
| 12• दैनिक टाचण वेळच्या वेळीच काढावे• | 12• शिक्षकांना तसे सुचविण्यात आले• |

| | |
|---|---|
| 13. स्पर्धा परिक्षेच्या मुलांची तयारी करून घेण्यात यावी. | 13. स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करून घेण्यात आली. |
| 14. भिलमाळ, ता. इगतपुरी, जि. नाशिक आश्रमशाळेची इमारत बांधणे गरजेचे आहे. | 14. त्याविषयी वरिष्ठांना कळविण्यात आले आहे. |
| 15. विद्यार्थ्यांना बोलके करण्याचे प्रयत्न व्हावेत. | 15. विद्यार्थ्यांनी स्वतः येऊन भाषण देणे याद्वारे त्यांच्या सूचनांचे अनुपालन केले. |
| 16. वर्ग सजावट अधिक असावी. | 16. वर्ग सजावट चांगली करून घेण्यात आली. |
| 17. खेळाकडे विशेष लक्ष द्यावे. | 17. खेळाकडे विशेष लक्ष देण्यात येईल. |
| 18. घटक नियोजनाप्रमाणे अभ्यास पूर्ण करावा. | 18. घटक नियोजनाप्रमाणे अभ्यास पूर्ण केला. |
| 19. शालेय इमारत विखुरलेल्या ठिकाणी असल्यामुळे शालेय अध्यापनात व प्रशासनात सुसंगती निर्माण होत नाही. (मु. नवापाडा, ता. साक्री, जि. धुळे) | 19. शालेय इमारत होणेस मागणी करण्यात आली. |
| 20. इंग्रजी, हिंदी विषयाचे लेखी काम अधिक असावे. गणित विषयाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. | 20. सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली. |
| 21. दृक्‌श्रवण साहित्याची नोंद रजिस्टरला घेण्यात यावी. | 21. नोंद घेण्यात आली. |
| 22. इंग्रजी विषयासाठी शिक्षक असणे आवश्यक आहे. | 22. इंग्रजी विषयाच्या शिक्षकासाठी मागणी केली आहे. |
| 23. विद्यानिकेतन या परिक्षेस मुलांना बसवावे. | 23. या परिक्षेस मुलांना बसविण्यात आले. |
| 24. शाळेच्या आवारात वृक्षरोपण करावे. | 24. शाळेच्या आवारात वृक्षरोपण केले. |
| 25. गैरहजेरीचे प्रमाण जास्त दिसून येते | 25. पालकांना भेटून हजेरीचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केला गेला. |
| 26. "गीतमंच" कार्यक्रमात सहभागी होण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. | 26. "गीतमंच" कार्यक्रमात भाग घेण्यास मुलांना प्रोत्साहित केले. |

| गोंडवन विभाग | गोंडवन विभाग |
| --- | --- |
| 27• विद्यार्थ्यांच्या जन्म तारखांची नोंद घेणे आवश्यक आहे• | 27•अनुपालनासाठी सूचना देण्यात आल्या• |
| 28• दहावीचा निकाल उंचावण्याचा प्रयत्न व्हावा• | 28•त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले• |
| 29• हस्ताक्षर सुधारण्यात यावे• | 29•विद्यार्थ्यांकडून वरीलप्रमाणे कार्यवाही चालू आहे• |
| 30• स्वच्छता राखणे,परिपाठ घेणे व अतिरिक्त वर्ग घेणे बाबत सूचना दिल्या• | 30•सूचनांवर कार्यवाही चालू आहे• |
| 31• शैक्षणिक चार्ट वर्गात लावण्याबाबत | 31•शैक्षणिक चार्ट तयार करून वर्गात लावण्यात आले• |
| 32• डोमा आश्रमशाळा,ता•चिखलदरा, जि•अमरावती च्या इमारत बांध-कामाबद्दल प्रयत्न व्हावे• | 32•वरिष्ठांशी पत्र व्यवहार चालू आहे• |
| 33• मासिक नियोजन,घटक नियोजन व टाचण काढावे• | 33•अनुपालन करण्यात येत आहे• |
| 34• सर्व रजिस्टर्स ठेवण्यात यावे• | 34•अनुपालन केले आहे• |
| 35• उपस्थितीचे प्रमाण कमी आहे• | 35•हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने पालकांच्या भेटी घेण्यात आल्या• |
| 36• शिक्षकांनी वार्षिक नियोजन करावे व दैनिक टाचण नियमित काढावे• | 36•अनुपालनासाठी सूचना देण्यात आल्या• |
| 37• शालेय रेकॉर्ड निटनेटके व सुवाच्य अक्षरात लिहिणे आवश्यक आहे• | 37•अनुपालनासाठी कार्यवाही करण्यात आली• |
| 38• विज्ञान साहित्य अपुरे आहे• | 38•त्याबाबत पूर्तता करण्यात आली• |
| 39• पत्र व्यवहारात वक्तशिरपणा ठेवावा• | 39•अनुपालन करण्यात येईल• |
| 40• शालानिहाय नियोजन असावे• | 40•अनुपालन करण्यात येईल• |

सन 1989 सहयादी विभाग

| | |
| --- | --- |
| 1• विज्ञान विषयाच्या अध्यापनावर व पाठे पाठांतरावर भर देणे• | 1• अनुपालन करण्यात येत आहे• |
| 2• शाळेची उपस्थिती 100 टक्के राहण्यासाठी प्रयत्न व्हावेत• | 2• कार्यवाहीसाठी प्रयत्न चालू आहेत• |

| | |
|---|---|
| 3. इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना मराठीचा वापर करावा. | 3. संबंधित विषय शिक्षकास सूचना देण्यात आल्या आहेत. |
| 4. 1989 मध्ये सूर्यमाळ, ता. मोखाडा, जि. ठाणे आश्रमशाळेस शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट नाही. | 4. त्याबाबत सूचना नाही व कार्यवाही नाही. |
| 5. वाचन लेखन सुधार प्रकल्प राबवून घ्यावेत. | 5. अनुपालन होत आहे. |
| 6. रजिस्टर क्रमांक 1 व हजेरीपत्रक याचा मेळ घालावा. | 6. अनुपालन करण्यात आले. |
| 7. चाचणी व स्वाध्याय नियमित घ्यावे. | 7. नियमित घ्यावयाचे ठरले. |
| 8. माताणे, ता. वसई, जि. ठाणे आश्रमशाळेची विजेची सोय करण्यात यावी. | 8. खाजगी ठेकेदाराकडून कोटेशन मागवून व मंजुरी घेऊन विजेची सोय करण्यात आली. |
| 9. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाटेल यासाठी जादा तास घ्यावेत. | 9. जादा तास घेण्यात येत आहेत. |
| 10. विज्ञान प्रयोग करण्याची संधी विद्यार्थ्यांना द्यावी. | 10. विद्यार्थ्यांना संधी देण्यात येते. |
| 11. शारिरीक शिक्षणासाठी विहित पात्रताधारक शिक्षक नेमावा. | 11. वरिष्ठांकडे मागणी सादर केली आहे. |
| 12. पंचसूत्री कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न व्हावा. | 12. अनुपालन करण्यात येत आहे. |
| 13. जवळे बाळेश्वर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर व कोळेवाडी, ता. राहुरी, जि. अहमदनगर आश्रमशाळेस इमारत अपूर्ण स्थितीत आहे त्यादृष्टीने कार्यवाही करावी. | 13. कार्यवाहीचा पत्र व्यवहार वरिष्ठांकडे सुरु आहे. 1991 साली कोळेवाडी, ता. राहुरीची इमारत पूर्ण करण्यात आली. |
| 14. अप्रशिक्षित शिक्षकांना पत्रद्वारा प्रशिक्षण पूर्ण करण्याबाबत प्रयत्नशील सूचना दिल्या. | 14. शिक्षकांनी याबाबत प्रयत्न करण्याबाबत कार्यवाही सुरु केली आहे. |
| 15. कांदवन, ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी येथील आश्रमशाळेतील मुलांचे जन्मदाखले अप्राप्त आहेत. | 15. मागणी केली असता आदिवासी पालक जन्म दाखले देऊ शकत नाहीत. |
| 16. वक्तृत्वस्पर्धा घेण्यात याव्यात. | 16. कार्यवाही करण्यात आली आहे. |
| 17. वृक्षारोपण करावे. | 17. 1700 नवीन झाडे लावली आहेत. |
| 18. परिसरातील आदिवासी मुलांना | 18. शालेय विद्यार्थी भरतीच्या वेळेस एकात्मिक व |

| | |
|---|---|
| प्राधान्य द्यावे• | परिसरातील आदिवासी मुलांना अधिक प्राधान्य देण्यात आले• |
| 19• विज्ञान प्रदर्शनात सहभाग घ्यावा• | 19•विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेण्यात आला• |
| 20• विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घ्यावेत• | 20•शिक्षकांना त्याप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत• |
| 21• विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा असावी• | 21•विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा तयार करण्यात आली आहे• |
| 22• गृहपाठ नियमितपणे तपासणे आवश्यक आहे• | 22•गृहपाठ नियमितपणे तपासून घेतले• |
| 23• विद्यार्थ्यांनी क्रिडा कौशल्यात भाग घेण्यास सांगितले• | 23•सूचनेचे अनुपालन होत आहे• |
| 24• इयत्ता 1 ते 4 वर्गाचे गणित व 5 वी ते 6 वी वर्गाची इंग्रजी व गणित विषयाची प्रगती समाधानकारक नाही• | 24•संबंधित वर्ग शिक्षकाकडून सूचनेप्रमाणे इयत्तावार विषयांची तयारी करून घेतली• |
| 25• विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्याचा प्रयत्न व्हावा• | 25•मुलांच्या पालकांना पत्रे पाठवून मुलांच्या गैरहजेरी बाबत चौकशी करून सूचना दिल्या• |
| 26• आश्रमशाळा होटगी,ता•दक्षिण सोलापूर,जि•सोलापूर येथे शाळेची इमारत नाही• | 26•शाळेस चार निमपक्के शेडस् शासनाने बांधून दिले• |
| 27• राष्ट्रीय कार्यक्रम कुटुंब कल्याण अल्पबचत,वृक्षारोपण इत्यादीत सक्रीय सहभाग असावा• | 27•कुटुंब कल्याणची एकही केस नाही• अल्पबचत केली जाते• वृक्षारोपण केले जाते• |
| 28• बालवाडीसाठी खेळण्यांची मागणी करावी• | 28•बालवाडी साहित्य व खेळण्यांची मागणी करण्यात आली• |
| 29• वार्षिक घटक नियोजन व सत्र प्रपत्रक लवकर तयार करावे• | 29•वार्षिक घटक नियोजन व सत्र ~~प्रपत्र~~ प्रपत्रक वर्गात लावण्यात आले• |
| 30• कविता गायन कृतीयुक्त पाठ करून घ्यावे• | 30•कार्यवाही करण्यात आली• |

## गोंडवन विभाग

| | |
|---|---|
| 31• विद्यार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाचे महत्व वाढवावे• | 31•वृक्षारोपण करण्यात आले आहे• |
| 32• आश्रमशाळा बेलदर,ता•रामटेक जि•नागपूर येथे 1989 मध्ये गट | 32•याबाबत सूचना नाहीत• |

शिक्षणाधिका-याची भेट झाली नाही•

| | |
|---|---|
| 33• विद्यार्थी वस्तू संग्रहालय निर्माण करण्यास सूचना दिली• | 33•विद्यार्थ्यांनी वस्तूंचा संग्रह करून संग्रहालय कारण्यात आले• |
| 34• राष्ट्रीय कार्यक्रम अल्पबचत,वन महोत्सव, कुटुंब कल्याण मोहिम इत्यादी उपक्रम राबविण्याबाबत सूचना केली• | 34•दिलेल्या सूचनेप्रमाणे सर्व कार्यक्रमात भाग घेण्यात आला• |
| 35• सावित्रीबाई फुले दत्तक योजना परिपाठ सुरू करावा• | 35•सावित्रीबाई फुले दत्तक योजना परिपाठ सुरू आहे• |
| 36• गणित व इंग्रजी विषयामध्ये मुले कच्ची असल्यामुळे जादा शिकवणी वर्ग घ्यावेत• | 36•जादा शिकवणी वर्ग घेण्यात येत आहेत• |
| 37• चौथी व सातवीचा निकाल चांगला लागण्यासाठी जुने पेपर्स सोडवून घ्यावेत• | 37•त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली• |
| 38• गीतमंच व शालेयगृहात नकाशे काढावे• | 38•शाळेत गीत मंचचा कार्यक्रम करण्यात वर्ग खोल्यात नकाशाचे तक्ते लावण्यात आले• |
| 39• घटक नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम मागे आहे• दोन शिक्षकांची कमतरता आहे• | 39•जादा वर्ग घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला• शिक्षकांसाठी वरिष्ठांकडे मागणी नोंदविली आहे• |
| 40• कोरटा,ता•उमरखेड,जि•यवतमाळ आश्रमशाळेची इमारत नादुरुस्त आहे नवीन बांधकाम हाती घ्यावे• | 40•संबंधित वरिष्ठ अधिका-यांचा पत्राद्वारे पाठपुरावा करावा• |
| 41• शिक्षकांजवळ दैनिक टाचण व नियोजन आढळले नाही• शाळेसाठी कंपाऊंड वॉल करून घ्यावी• | 41•शिक्षकांकडून करार्यवाही करून घेण्यात येत आहे• कंपाऊंड वॉलसाठी मागणी करण्यात येत आहे• |
| 42• सुविचार दर सोमवारी प्रार्थनेपूर्वी लिहावा• | 42•अनुपालन करण्यात येत आहे• |
| 43• शिक्षक व पालक यांचा संपर्क असणे आवश्यक आहे• | 43•शिक्षक व पालक यामध्ये संपर्क साधण्याचा प्रयत्न केला आहे• |
| 44• शैक्षणिक चार्ट वर्गामध्ये लावणे आवश्यक आहे• | 44•शैक्षणिक चार्ट शिक्षकांकडून तयार करून घेण्यात आले आहेत• |

सन 1990 — सह्याद्री विभाग

| | |
|---|---|
| 1• सहावी मधील विद्यार्थ्यांकडून इंग्रजी कविता पाठांतर करून घ्याव्यात• | 1• विद्यार्थ्यांकडून इंग्रजी कविता पाठांतरीत करून घेण्यात येत आहेत• |
| 2• साकूर,ता•जव्हार,जि•ठाणे आश्रमशाळेतील फर्निचर अपूर्ण आहे• | 2• आदिवासी विकास अधिकारी शहापूर यांना कळविण्यात आले आहे• |
| 3• शिष्यवृत्ती व विद्यानिकेतन परिक्षेची करून घ्यावी• | 3• शिष्यवृत्ती व विद्यानिकेतन परिक्षेची तयारी करून घेतली• |
| 4• कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रयत्न व्हावेत• | 4• कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी प्रयत्न करण्यात आले• |
| 5• मुलांच्या आरोग्याच्या संदर्भात वर्ग शिक्षकाने लक्ष द्यावे• | 5• वर्ग शिक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत• |
| 6• सानेगांव,ता•रोहा,जि•रायगड आश्रमशाळेस प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची गरज आहे• | 6• त्याप्रमाणे वरिष्ठांकडे कार्यवाही करण्यात आली आहे• |
| 7• लोकसंख्या शिक्षण प्रकल्पाच्या कार्यवाही बाबत सुरुवात करावी• | 7• उपरोक्त शिक्षण प्रकल्प राबविला जात आहे• |
| 8• दैनिक वाचण,घटक नियोजन पर्यवेक्षक अभ्यासक्रम हाती घ्यावा• | 8• सूचनेप्रमाणे जास्तीचे तास सुरु करण्यात आले• |
| 9• निगडोल,ता•दिंडोरी,जि•नाशिक आश्रमशाळेच्या मुलांच्या 100 टक्के उपस्थितीबाबत टिकविण्या-बद्दल प्रयत्न व्हावेत• | 9• प्रयत्न करण्यात येत आहेत• |
| 10• प्रयोगशाळा विभागवार असावी व ग्रंथालयातील ग्रंथाची वाढ करावी• | 10•त्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत व वरिष्ठांशी पत्र व्यवहार सुरु आहे• |
| 11• व्याकरणासाठी जादा तास घ्यावेत• | 11•अंमलबजावणी करण्यात आली• |
| 12• स्वाध्याय निबंध लक्षपूर्वक तपासले जावेत• | 12•अनुपालन करण्यात आले आहे• |
| 13• इयत्ता 1 ली ते 7 वी पर्यंतच्या मुलांचे लेखन,वाचन,इंग्रजी,गणित विषयाची प्रगती कमी दिसून आली• | 13•लेखन,वाचन इंग्रजी व गणित विषयांची वर्ग शिक्षकाकडून तयारी करून घेण्यात आली• |
| 14• इयत्ता 3 री व 4 थी साठी "प्रयोगातून विज्ञान"हे विषय ठेवावे• | 14•त्याप्रमाणे शिकविण्यास प्रारंभ केला• |

| | |
|---|---|
| 15• शालेय प्रतवारी ठेऊन प्रतवारी निश्चित करावी• | 15•शालेय प्रतवारी ठेऊन प्रतवारी वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे• |
| 16• आश्रमशाळा,नवापाडा,ता•साक्री जि•धुळे येथील विद्यार्थ्यांची गळती कमी करण्याचा प्रयत्न व्हावा• | 16•पालकांशी संपर्क साधून शिक्षणाचे महत्व पटवून गळती कमी करण्याचा प्रयत्न केला• |
| 17• कुटुंब नियोजन,अल्पबचत,वृक्षारोपण या राष्ट्रीय कार्यक्रमांना महत्व द्यावे• | 17•राष्ट्रीय कार्यक्रमाबाबत कार्यवाही करण्याचे प्रयत्न होतात• |
| 18• घटक चाचण्या साप्ताहिक घ्याव्यात• | 18•घटक चाचण्या साप्ताहिक घेण्यात येत आहेत• |
| 19• आश्रमशाळा,चुलवड,ता•अक्राणी जि•धुळे येथील पटसंख्या पाहता एका शिक्षकाची नियुक्ती होणे आवश्यक आहे• | 19•आदिवासी विकास अधिकारी, तळोदा यांना कळविण्यात आले आहे• |
| 20• शिष्यवृत्ती परिक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग असावा• | 20•अनुपालन करण्यात येत आहे• |

गोंडवन विभाग

----------

| | |
|---|---|
| 21• आश्रमशाळा कवडस,ता•हिंगणा, जि•नागपूर इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पाठवावा• | 21•त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली• |
| 22• विज्ञान मंडळाची स्थापना करून विज्ञान विषयक उपक्रम राबवावेत• | 22•शाळेत विज्ञान मंडळाची स्थापना करून विज्ञान विषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत• |
| 23• स्कॉलरशिप,विद्यानिकेतन,नवोदय परिक्षांना विद्यार्थी बसवावे• | 23•परिक्षांना विद्यार्थी बसतात• |
| 24• शिक्षण विभाग अधिकारी हरिसाल बीट यांनी कुटुंगा,ता•धारणी, जि•अमरावती शाळेस भेट दिली असता काही शिक्षक कर्मचारी गैरहजर होते• तेव्हां त्यांच्याकडून लेखी स्पष्टीकरण मागवावे• | 24•गैरहजर कर्मचा-यांचा पगार कापण्यात आला व त्यांच्याकडून लेखी स्पष्टीकरण मागविण्यात आले• |
| 25• घटक चांचणी व पोरपाठ घेण्यात यावेत• | 25•कार्यवाही करण्यात आली• |
| 26• वाई खुर्द,ता•वरुड,जि•अमरावती शाळेत गैरहजर प्रमाण जास्त आहे• | 26•पालकांना भेटून विद्यार्थ्यांचे गैरहजेरी प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला• |
| 27• गळती शोध पुस्तिका आखून रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्यात यावे• | 27•रेकॉर्ड ठेवण्यात येत आहे• |

| | |
|---|---|
| 28• पहिल्या व दुस-या वर्गाला अक्षर ओळख नाही• | 28•मुलांकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन त्रुटींची पूर्तता केली जाईल• |
| 29• इंग्रजी तासात " " प्रमाणे अध्यापन करावे• | 29•अनुपालन करण्यात येत आहे• |
| 30• सहलीचे आयोजन करावे• | 30•कार्यवाही करण्यात येत आहे• |
| 31• प्रतिज्ञा लेखात जातीचा उल्लेख करावा• | 31•प्रतिज्ञा लेखात जातीची नोंद घेतली आहे• |
| 32• विद्यार्थ्यांकडून हस्तकला निर्मित वस्तू तयार कराव्या• | 32•हस्तकला वस्तू तयार करून घेण्यात आल्या• |
| 33• 3 री ते 7 वी पर्यंतच्या मुलांना पाठांची संख्या सांगता येत नाही• | 33•शिक्षकामार्फत अनुपालन करण्यात येत आहे• |
| 34• वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अभ्यासात मग्न रहावे याबद्दल शिक्षकांना देखरेखीच्या कामासाठी पाळ्या लावून देण्यात याव्यात• | 34•पाळ्याप्रमाणे शिक्षकांना देखरेखीच्या कामासाठी नेमण्यात येत आहे• |
| 35• विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडांगण उपलब्ध करुन द्यावे• जिल्हाधिकारी यांच्याशी खेळ सामानासाठी संपर्क साधावा• | 35•अनुपालन करण्याचे प्रयत्न होत आहेत• |
| 36• वृक्षारोपण कार्यक्रम दरवर्षी राबविण्यात यावा• | 36•कार्यक्रम दरवर्षी राबविण्यात येत आहे• |
| 37• मुलांच्या उपस्थितीकडे लक्ष पुरविण्यात यावे• | 37•उपस्थितीकडे लक्ष पुरविण्यात येत आहे• |
| 38• गृहपाठ नियमितपणे तपासण्यात यावेत• | 38•गृहपाठ नियमितपणे तपासण्यात येत आहेत• |

---

3•12 1990 मध्ये वार्षिक परिक्षेत 25 टक्के पेक्षा कमी व 50 टक्के पर्यंत निकाल लागलेल्या आश्रमशाळांची संख्या व विशेषतः सातवी व दहावीच्या परिक्षेच्या कमी निकालाची कारणे या बाबतींची माहिती गोळा करण्यात आली आहे• खालील तक्त्यामध्ये ही माहिती देण्यात येत आहे•

तक्ता क्र.3.6

सन 1990 मध्ये वार्षिक परीक्षेत 25 टक्के पेक्षा कमी व 50 टक्के पर्यंत निकाल लागलेल्या आश्रमशाळांची संख्या (कमी निकाल लागलेल्या कारणासह)

| अ.क्र. | विभाग सहयाद्री/गोंडवन | विवरण | माहिती प्राप्त आश्रमशाळांची संख्या | आश्रमशाळांची संख्या इ.1 ते 4 | इ.5 ते 7 | इ.8 ते 10 | कमी निकाल लागण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | सहयाद्री | 25 टक्के कमी | 60 | 2 | 2 | 5 | 1. शाळेतील प्रतिकुल वातावरणामुळे निकाल सर्व विषयात कमी |
| 2. | गोंडवन | --"-- | 38 | 1 | 1 | 5 | 2. इंग्रजी व गणित विषय मुलांना अवघड गेल्यामुळे अपेक्षेपेक्षा कमी |
| 3. | एकूण | | 98 | 3 | 3 | 10 | |
| 1. | सहयाद्री | 50 टक्के पेक्षा कमी | 60 | 3 | 3 | 9 | 3. मुलांची गैरहजेरी व शिक्षण साहित्याचा अभाव. |
| 2. | गोंडवन | --"-- | 38 | 1 | 1 | 3 | 4. शिक्षक वर्ग अपूरा आहे |
| 3. | एकूण | | 98 | 4 | 4 | 12 | 5. एका शाळेत काही मुले आजारी पडल्यामुळे निकाल कमी आहे. 6. शिक्षकांनी तयारी करून न घेतल्यामुळे |

3•13 बहुतेक दहावीचे निकाल कमी टक्केवारीत लागलेले आहेत• कमी निकाल लागलेल्या आश्रमशाळांची कारणे नमूद केली आहेत• ती वरील तक्त्यांमध्ये दर्शविण्यात आली आहेत• याशिवाय सातवी इयत्तेचे आश्रमशाळाचे निकाल समाधानकारक लागलेले नाहीत•

3•14 समाधानकारक निकाल न लागलेल्या शाळेंचा शिक्षण विभागांच्या अधिका-यांनी आढावा घेण्यात येऊन शैक्षणिक साहित्याच्या अनुषंगाने काही सूचना करण्यात आल्या•

1• अध्यापनात शिक्षकांनी साहित्य स्वतः निर्माण करावे•
2• आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य आदिवासी विकास अधिका-यांकडून मिळण्यासाठी पाठपुरावा करावा•
3• भूगोलाचे नकाशे, विज्ञान साहित्य, भूमिती साहित्य पुरेसे असावे•
4• गृहपाठ नित्य नियमाने देणे आवश्यक आहे•
5• दैनिक टाचण काढणे अपरिहार्य आहे• इ•

3•15 शिक्षकांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रांना शिक्षकांचा सहभाग 1986 सालापासून ते 1990 सालापर्यंत होता किंवा नाही हे पुढील दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट होईल•

तक्ता क्र•3•7

शिक्षकांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रांना शिक्षकांचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| अ•क्र• | वर्ष | प्रशिक्षण सत्रांची संख्या | कालावधी | सहभाग घेतलेल्या शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1• | 1986 | 43 | कमीत कमी 1 दिवस जास्तीत जास्त एक महिना | 176 |
| 2• | 1987 | 66 | ---"--- | 136 |

| 1 | 2 | 3 | 4 | 6 |
|---|---|---|---|---|
| 3. | 1988 | 52 | ---"--- | 99 |
| 4. | 1989 | 64 | ---"--- | 129 |
| 5. | 1990 | 40 | ---"--- | 98 |
| | एकूण | 265 | | 638 |

3.16 शिक्षकांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने 1986 ते 1990 या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये एकूण 265 प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले. त्यामध्ये एकूण 638 शिक्षकांनी भाग घेतला होता. या प्रशिक्षण सत्रांचा कालावधी कमीत कमी 1 दिवस व जास्तीत जास्त एक महिना होता. या प्रशिक्षण सत्रामध्ये सर्वसाधारणपणे खालील प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले होते.

1. गणित, विज्ञान प्रशिक्षण 2. सांस्कृतिक प्रशिक्षण 3. नवीन शैक्षणिक धोरण 4. अधीक्षकांसाठी प्रशिक्षण 5. बालवाडी प्रशिक्षण 6. इंग्रजी प्रशिक्षण 7. अध्यापन प्रशिक्षण 8. कार्यानुभव प्रशिक्षण 9. साबण निर्मिती प्रशिक्षण 10. मुख्याध्यापकांसाठी प्रशिक्षण 11. योगासने प्रशिक्षण 12. प्रथमोपचार प्रशिक्षण 13. चित्रकला प्रशिक्षण 14. लोकसंख्या प्रशिक्षण 15. सर्व्हेक्षण शिबिर 16. धोरण प्राथमिक उद्बोधन वर्ग 17. शैक्षणिक उठाव कार्यक्रम 18. एन.सी.ई.आर.टी. 19. कृत्रीसत्र 20. प्रबोधन वर्ग 21. भारत स्काऊट गाईड 22. नेतृत्व प्रशिक्षण 23. गीतमंच 24. पर्यावरण 25. आरोग्य विषयक प्रशिक्षण 26. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण 27. वर्ग-1 व 2 च्या नवीन अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन 28. क्रीडाविषयक प्रशिक्षण 29. जनगणना प्रशिक्षण . सर्वसाधारणपणे अशा प्रकारच्या बाबींवर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

3.17 शिक्षण क्षेत्रामध्ये गट संमेलने प्रत्येक बिटमध्ये भरविण्यात येतात. ही गट संमेलने गट शिक्षणाधिकारी अथवा शिक्षण विस्तार अधिकारी यांच्यामार्फत ज्या शाळेवर पोहचण्यासाठी येण्या-जाण्याच्या सुविधा असतील, शिवाय शाळांमध्ये सहजासहजी पोहचता येईल त्या शाळांमध्ये भरविली जातात. या संमेलनामध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमाविषयी त्यांना दैनंदिन येणाऱ्या विविध अडचणींवर चर्चा घडवून आणण्यासाठी ही गट संमेलने भरविली जातात. शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी व शिक्षणामधील विविध अभ्यासक्रमाच्या उजळणीसाठी शिक्षकांना मार्गदर्शन मिळण्यासाठी ही गट संमेलने आवश्यक आहेत. खालील तक्त्यामध्ये गट संमेलनाबाबतची आकडेवारी दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र.3.8

गट संमेलनाची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | विभाग सह्याद्री/गोंडवन | माहिती प्राप्त आश्रम-शाळांची संख्या | विटमध्ये गट संमेलने भर-विलेल्या आश्रमशाळांची संख्या | भरविलेल्या गट संमेलनाची संख्या | टक्केवारी (रकाना 4 ची रकाना 3 शी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | सह्याद्री | 60 | 55 | 101 | 91 |
| 2. | गोंडवन | 38 | 18 | 24 | 47 |
| | एकूण | 98 | 73 | 125 | 74 |

3.18 उपरोक्त तक्त्यामध्ये गोंडवन विभागात 47 टक्के आश्रमशाळांनी गट संमेलने भरविली आहेत, असे दिसते. ही गट संमेलने शैक्षणिक मार्गदर्शनासाठी भरविणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आले आहे.

3.19 काही आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाच्या दृष्टीने विज्ञान प्रदर्शने आयोजित केली जात आहेत. "आदर्श" आश्रमशाळा" कशी असावी याबाबतच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. विशेषतः खालील बाबो आश्रमशाळेमध्ये असणे आवश्यक आहे. त्यावरून आदर्श आश्रमशाळा ठरविण्यात येते.

1. वस्तु संग्रहालय 2. शिक्षकांची विद्यार्थ्यांवर असलेली प्रेमपूर्वक वागणूक 3. पुस्तकालय 4. शाळेतील स्वच्छता 5. विद्यार्थ्यांना शारिरीक शिक्षण 6. मुलांच्य. आरोग्यविषयक दक्षता, प्रथमोपचार पेटी ठेवणे 7. सांस्कृतिक कार्यक्रम ठेवणे 8. झाडे लावणे 9. वार्षिक सहली आयोजित करणे 10. पालकांचा मेळाव भरविणे इ.वर आदर्श आश्रमशाळेचा दर्जा अवलंबून आहे. काही आश्रमशाळा क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेत असतात, आंतरवर्गीय, तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन होत असते.

याशिवाय शाळेतील मुलींसाठी लोकनृत्याच्या स्पर्धांचे आयोजनही होत असते. विविध स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या आश्रमशाळांची (एक, दोन, तीन वेळेस) संख्या खालील तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

तक्ता क.3.9

विज्ञान प्रदर्शन, आदर्श आश्रमशाळा स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा इ.मध्ये भाग घेतलेल्या आश्रमशाळांची संख्या

| अ.क्र. | विभाग सह्याद्री | माहिती प्राप्त आ.शा.ची संख्या | विज्ञान प्रदर्शन एक वेळेस | विज्ञान प्रदर्शन दोन | विज्ञान प्रदर्शन तीन | आदर्श शाळा एक वेळेस | आदर्श शाळा दोन | आदर्श शाळा तीन | क्रीडा स्पर्धा एक वेळेस | क्रीडा स्पर्धा दोन | क्रीडा स्पर्धा तीन | लोकनृत्य एक | लोकनृत्य दोन | लोकनृत्य तीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 1. | सह्याद्री | 60 | 23 | 10 | 5 | 7 | 1 | 1 | 29 | 25 | 45 | 15 | 9 | 8 |
| 2. | गोंडवन | 38 | 7 | 2 | 1 | 1 | 2 | 0 | 22 | 21 | 19 | 12 | 11 | 6 |
| | एकूण | 98 | 30 | 12 | 6 | 8 | 3 | 1 | 51 | 46 | 64 | 27 | 20 | 14 |

3.20 उपरोक्त तक्त्यामध्ये असे दिसून येईल की, आश्रमशाळांचा सहभाग क्रीडा स्पर्धेमध्ये जास्त आहे. सर्वात कमी सहभाग "आदर्श" शाळा" हे नामकरण प्राप्त करण्याच्या मोहिमेमध्ये आहे.

3.21 शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची प्रशासकीय तपासणी प्रकल्प अधिकारी (एकात्मिक विकास) आदिवासी विकास अधिकारी, आदिवासी विकास निरीक्षक करतात. हे अधिकारी आश्रमशाळांना वारंवार भेटीही देत असतात. या ज्या वेळेस ते भेटी देतात, त्या भेटीच्या वेळेस आर्थिक व्यवहार शालेय व्यवस्थापन, वसतीगृह व्यवस्थापन, भोजन व्यवस्था, विद्यार्थ्यांचे आरोग्य, त्यांची अभ्यासातील प्रगती, त्यांचे गणवेष, राहण्याची, झोपण्याची व्यवस्था इ.बाबींचे अवलोन करतात. खालील तक्त्यामध्ये प्रकल्प अधिकारी (एकात्मिक विकास योजना) आदिवासी विकास अधिकारी व इतर अधिकारी (यामध्ये आदिवासी कल्याण निरीक्षक मा.संचालक, आदिवासी विकास, मा.आयुक्त, आदिवासी विकास, उपसंचालक, आदिवासी

विकास इ•अधिका-यांचा समावेश आहे•) यांनी भेटी दिलेल्या आश्रमशाळांची संख्या सन 1989 व 1990 या वर्षातील देण्यात आली आहे•

तक्ता क्र•3•10

आदिवासी विकास विभागाच्या अधिका-यांनी भेटी दिलेल्या आश्रमशाळांची संख्या दर्शविणारा तक्ता 1989 व 1990 अखेर

| अ• क्र• | विभाग सह्याद्री गोंडवन | अधिका-यांचा हुद्दा | माहिती प्राप्त आ•शा• संख्या | सन 1989 मध्ये भेट दिलेल्या आश्रमशाळांची संख्या | | | सन 1990 मध्ये भेट दिलेल्या आश्रमशाळांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एक वेळेस | दोन वेळेस | तीन वेळेस | एक वेळेस | दोन वेळेस | तीन वेळेस |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1• | सह्याद्री | प्रकल्प अधिकारी | 60 | 25 | 6 | 7 | 16 | 9 | 5 |
| 2• | गोंडवन | --"-- | 38 | 6 | 1 | 1 | 17 | 6 | 2 |
| | एकूण | | 98 | 31 | 7 | 8 | 33 | 15 | 7 |
| 1• | सह्याद्री | आ•वि•अ• | 60 | 21 | 16 | 11 | 27 | 16 | 9 |
| 2• | गोंडवन | --"-- | 38 | 10 | 10 | 11 | 9 | 6 | 17 |
| | एकूण | | 98 | 31 | 26 | 22 | 36 | 22 | 26 |
| 1• | सह्याद्री | इतर अधिकारी व व्यक्ती | 60 | 10 | 13 | 24 | 5 | 14 | 23 |
| 2• | गोंडवन | --"-- | 38 | 15 | 4 | 8 | 19 | 5 | 11 |
| | एकूण | | 98 | 25 | 17 | 32 | 24 | 19 | 34 |

3•22 उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, आदिवासी विकास अधिका-यांनी 1990 वर्षामध्ये 1989 वर्षापेक्षा जास्त आश्रमशाळांना भेटी दिलेल्या आहेत• सर्वसाधारणपणे वर्षामध्ये सर्वच्या सर्व आश्रमशाळांना भेटी देणे आवश्यक आहे•

3•23 आदिवासी विकास अधिका-यांनी तपासणी व भेटीच्या वेळेस मुख्याध्यापकांना व शिक्षकांना सर्वसाधारणपणे केलेल्या सूचनांचा परामर्श खालीलप्रमाणे देण्यात येत आहे•

1• विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकडे लक्ष द्यावे• 2• 6 वी व 7 वी च्या मुलांच्या इंग्रजी व गणित विषयाची तयारी करून घ्यावी 3• विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्याच्या दृष्टीने जादा तासिका घेण्यात याव्यात• 4• सर्व शिक्षकांनी दैनिक वाचण, घटक नियोजन तयार करावे• 5• गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी त्यांच्या पालकांना कळविणे आवश्यक आहे• 6• 10 वी चा निकाल जास्त टक्के लागण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे• 7• मंदबुध्दीच्या विद्यार्थ्यांकडे लक्ष पुरवावे• 8• पालक मेळावा आयोजित करावा 9• विद्यार्थ्यांच्या सहली व वनभोजन आयोजित करावे• 10• दत्तक योजना राबविणे 11• पर्यवेक्षित अभ्यासक्रम राबविणे• 12• स्पर्धात्मक परीक्षा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा इ•चे आयोजन करणे• 13• मुख्याध्यापक व वसतीगृह व्यवस्थापकांनी अति महत्वाच्या कामाशिवाय मुख्यालय सोडू नये• 14• आजारी मुलांच्या बाबतीत नेहमीच दक्ष रहावे• 15• स्वयंपाकगृहात साफसफाई ठेवावी• 16• जनजागृती सप्ताहामध्ये लोकांशी कसा संपर्क साधावा याबाबत मार्गदर्शन करावे• 17• वसतीगृहामध्ये स्वच्छता राखावी• 18• नियमित वर्ग स्वच्छ ठेवावे, मुलांचे कपडे, हातपाय स्वच्छ राखावे व तपासणी करावी• 19• स्थानिक शिक्षण समितीच्या सभा वेळोवेळी घ्याव्यात•

3•24 आश्रमशाळेस प्राथमिक आरोग्य केंद्रातील व ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकिय अधिकारी व त्यांच्या हाताखालील कर्मचारी वर्ग दर महिन्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी भेट देत असतो• विविध स्तरावरील आरोग्य अधिका-यांनी 1990 या वर्षामध्ये दिलेल्या भेटीबाबतची व तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालील तक्त्यामध्ये नमूद करण्यात आली आहे•

तक्ता क्र·3·11

1990 वर्षामधील विविध स्तरावर वैद्यकिय अधिका-यांनी दिलेल्या भेटींची संख्या व तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

| अ· क्र· | अधिका-याचे नांव | विभाग सह्याद्री/ गोंडवन | 1990 मध्ये दिलेल्या भेटींची संख्या | तपासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ·1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· | ·6· | ·7· |
| 1· | जिल्हास्तरा-वरील अधिकारी | सह्याद्री | 12 | 724 | 187 | 911 |
| | | गोंडवन | 9 | 499 | 51 | 550 |
| | | एकूण | 21 | 1223 | 238 | 1461 |
| 2· | प्राथमिक आरोग्य अधिकारी | सह्याद्री | 124 | 11109 | 3225 | 14334 |
| | | गोंडवन | 87 | 7774 | 1766 | 9540 |
| | | एकूण | 211 | 18883 | 4991 | 23874 |
| 3· | ऑक्झीलरी नर्स मिड-वाईफ | सह्याद्री | 61 | 2659 | 1060 | 3719 |
| | | गोंडवन | 38 | 1847 | 667 | 2514 |
| | | एकूण | 99 | 4506 | 1727 | 6233 |
| 4· | तांत्रिक कर्मचारी | सह्याद्री | 50 | 3667 | 1218 | 4885 |
| | | गोंडवन | 39 | 3054 | 686 | 3740 |
| | | एकूण | 89 | 6721 | 1904 | 8625 |

| अ· क· | अधिका-याचे नांव | विभाग सह्याद्री/ गोंडवन | 1990 मध्ये दिलेल्या भेटींची संख्या | तपासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुले | मुली | एकूण |
| ·1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· | ·6· | ·7· |
| 5· | आरोग्य निरीक्षक | सह्याद्री | 22 | 1928 | 533 | 2461 |
| | | गोंडवन | 30 | 1019 | 157 | 1176 |
| | | एकूण | 52 | 2947 | 690 | 3637 |

3·25 सह्याद्री विभागातील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी ｛विविध स्तरावरील｝ यांनी आश्रमशाळांना दिलेल्या भेटींची संख्या गोंडवन विभागापेक्षा जास्त आहे, असे दिसते· ग्रामीण रूग्णालयातील व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी अथवा कर्मचारी (Para Medical Personnel) यांनी महिन्यातून किमान एक वेळेस त्यांच्या अंमलाखालील दिलेल्या आश्रमशाळेस भेट द्यावी, असे आहे·

3·26 वैद्यकिय अधिकारी यांनी आश्रमशाळेतील मुलांची वैद्यकिय तपासणी वर्षातून दोन वेळेस करावी, असे आहे· प्रपत्रामध्ये वैद्यकिय अधिकारी दोन वेळेस भेटी दिलेले सन 1986 ते 1990 या कालावधीतील दिनांकाची माहिती मागविण्यात आली होती· या दिनांकाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, वैद्यकिय अधिका-यांनी काही शाळांची वैद्यकिय तपासणी सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त अवधीमध्ये केली आहे· ब-याचश्या आश्रमशाळांमध्ये त्यांनी एका भेटीनंतर लगेचच दुस-या महिन्यात शाळेत भेट दिली आहे· काही ठिकाणी संपूर्ण वर्षामध्ये एकदाच तपासणी केली आहे· वर्षाच्या सुरवातीस म्हणजे साधारणतः जून व जुलै या महिन्यामध्ये फारच थोडया वैद्यकिय अधिका-यांनी शाळेची वैद्यकिय तपासणी केली आहे·

3·27 आश्रमशाळांची वैद्यकिय तपासणी केल्यानंतर वैद्यकिय अधिका-यांना सन 1986 ते 1990 या कालावधीमध्ये मुख्यतः पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये रोग आढळून आले होते· हिवताप, खरूज, लहान मुलांना जंत होणे, डोळे येणे, ॲनिमिया, डोकेदुखी, जुलाब होणे, वांत्या होणे, पोटदुखी, रातआंधळेपणा, खोकला, कुष्टरोग, टॉन्सिल्स, दंतविकार, शरीरावरील चट्टे, फल्यू, सर्दी- पडसे, गालगुंड, कृमी होणे, कांजण्या, व्हिटॅमिन "ए" ची कमतरता इ·

3·28 आश्रमशाळेच्या मुलांना होणा-या या विविध विकारावर वैद्यकिय अधिका-यांच्या सल्ल्याप्रमाणे गोळया, इंजेक्शने व द्रवरूप औषध त्वरीत देण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापकांनी ही औषधे त्वरीत मिळवून देण्याबाबत मदत केली. याशिवाय ज्या मुलांना औषधे देण्यात आली, त्या मुलांची मुख्याध्यापकातर्फे अथवा शिक्षकातर्फे चौकशी करण्यात आली. या चौकशीचा मुख्य उद्देश म्हणजे आजारी मुले नियमितपणे औषधे घेतात किंवा नाही हा होय. जास्त आजारी पडलेल्या मुलांना प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात येते. त्यांच्या आजाराविषयी पालकांना कळविण्यात येते. खरूज व य इतर त्वचा रोग असलेल्या मुलांना रोज आंघोळ करण्याबाबत सूचना केल्या होत्या.

3·29 विद्यार्थी आजारी पडल्यानंतर आश्रमशाळेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिका-यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यात एखाद दुस-या शाळेचा अपवाद असू शकेल. आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी कळविलेलया माहिती आधारे वैद्यकिय अधिका-यांनी शाळांना भेटी, औषधी गोळया व इंजेक्शने दिलेली आहेत. बहुतेक वैद्यकिय अधिका-यांना सूचना मिळताच तपासणीबाबत व औषधे पुरविण्याबाबत त्वरीत कार्यवाही होते.

3·30 आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी वैद्यकिय अधिका-यांना तपासणीसाठी सूचना दिल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्राकडून त्वरीत कार्यवाही होते काय ? याबाबतची स्पष्ट मत माहिती करून घेतली असता, बहुतेक मुख्याध्यापकांनी औषधोपचार केला जातो, असे नमूद केले आहे. सर्वच प्रकारची औषधे प्राथमिक आरोग्य केंद्राकडे उपलब्ध होत नाहीत. ती काही प्रमाणात बाहेरून आणावी लागतात. काही वैद्यकिय अधिकारी आश्रमशाळेच्या मुलांना औषधोपचार करण्यामध्ये अग्रक्रम देतात. काही प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये इंजेक्शनची उपलब्धता नसल्यामुळे अडचण निर्माण होते. दुर्गम भागातील आश्रमशाळेस वैद्यकीय केंद्रामध्ये औषधाचा साठा अपुरा पडत असल्यामुळे बरीचशी औषधे मुख्याध्यापकांना बाहेरून आणावी लागतात. काही वेळस शिपाई आजारी मुलांबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पाठवून औषधोपचार करण्यात येतो.

3·31 बहुतेक वेळेस आश्रमशाळेतील विद्यार्थी आजारी पडल्यामुळे औषधे उपचाराकरिता खाजगी दवाखान्यात न्यावे लागते. खालील तकत्यामध्ये वर्षवार खाजगी डॉक्टरांकडे न्यावे लागणा--या प्रसंगाची माहिती देण्यात आली आहे.

तक्ता क्र•3•12

विद्यार्थ्यांना खाजगी डॉक्टरांकडे उपचारासाठी न्यावे लागणा-या प्रसंगाची माहिती

| अ• क्र• | वर्ष | विभाग सह्याद्री गोंडवन | खाजगी डॉक्टरांकडे नेलेल्या मुलांची संख्या | आजाराचे स्वरूप | खाजगी डॉक्टरांकडे नेण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1• | •2• | •3• | •4• | •5• | •6• |
| 1• | 1986 | सह्याद्री<br>गोंडवन | 653<br>245 | जुलाब, वांती, डोळे त्वचा रोग, खरूज थंडीताप, पोटदुखी ताप, गालसुजी, उलटी मुदतीज्वर इ• | पावसाळयामुळे, औषधे उप-लब्ध नसल्याने, काहीठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र लांब आहे• वाहनाची सोय नसल्यामुळे वैद्यकिय अधिका-यांकडून वेळीच आरोग्य तपासणी होत नसल्यामुळे, प्रा•आ•कें• च्या जुजबी उपायामुळे क्वचित प्रसंगी रात्रीच्या वेळी जावे लागते• |
| 2• | 1987 | सह्याद्री<br>गोंडवन | 724<br>249 | हिवताप, खोकला खरूज, डोकेदुखी त्वचारोग, वांती, जुलाब, पोटदुखी कावीळ, बेंड, डोळे येणे, फल्यू | एस•टी•वेळेवर येत नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र दूर आहे• उपलब्ध असलेल्या औषधाने बरे वाटत नाही• प्राथमिक आरोग्य केंद्र बरेच अंतरा-वर आहे• रात्रीच्या वेळेस खाजगी डॉक्टरांकडे जावे लागते• |

| अ·क्र· | वर्ष | विभाग सह्याद्री गोंडवन | खाजगी डॉक्टरांकडे नेलेल्या मुलांची संख्या | आजाराचे स्वरूप | खाजगी डॉक्टरांकडे नेण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· | ·6· |
| 3· | 1988 | सह्याद्री<br>गोंडवन | 800<br>220 | डोकेदुखी, वांत्या, डोळ्याचे विकार, हिव-ताप, कावीळ, त्वचारोग जुलाब, खरूज, खोकला सर्दी, अचानक अस्वास्थ | प्राथमिक आरोग्य केंद्र दूर आहे व ते सुट्टीचे दिवशी बंद असल्यामुळे, प्रा·आ·के· कडून वेळीच तपासणी होत नसल्यामुळे व त्यांच्या जुजबी उपचारामुळे तातडीची गरज म्हणून काही वेळेस आरोग्य अधिकारी हजर नसल्यामुळे रात्रीच्या वेळेत इत्यादी· |
| 4· | 1989 | सह्याद्री<br>गोंडवन | 1070<br>343 | फल्यू, चक्कर येणे, सांधा निखळणे, खरूज त्वचारोग, गलगंड सर्दी, ब्रोटाला जखम पोटदुखी, तोंडवर जखम होणे, अतिसार | सुटीच्या दिवशी प्रा·आ·कें· बंद असल्यामुळे काही ठिकाणी प्रा·आ·कें·दूर आहे· क्रीडा स्पर्धेत गेल्या-मुळे तातडीची गरज म्हणून डॉक्टर हजर नसल्यामुळे |
| 5· | 1990 | सह्याद्री<br>गोंडवन | 1176<br>427 | टॉन्सिल्सचा त्रास विंचू दंश, खोच पडली त्वचा रोग, वांत्या, जुलाब, डोळे येणे, डोके दुखी, फल्यू, डायरिया कानात खडा गेल्यामुळे हिस्टेरिया {भूतबाधा} विषमज्वर, गेस्ट्रो | प्रा·आ·कें·दूर असणे, वाहतूकीअभावी, गेस्ट्रोची लक्षणे, रात्री, अपरात्री आवश्यकता भासते, रविवारी सुटीच्या दिवशी दवाखान्यात डॉक्टर नसल्यामुळे इ· |

3•32 वरील तक्त्यामध्ये आश्रमशाळेच्या वर्षवार खाजगी डॉक्टरांकडे औषधोपचाराकरिता न्यावे लागलेल्या मुलांची संख्या दिली आहे• मुलांच्या आजाराचे स्वरूप व खाजगी डॉक्टरांकडे न्यावयाचे कारणही नमूद केले आहे• विविध प्रसंगानुसार व आवश्यक कारणानुसार मुलांना खाजगी डॉक्टरांकडे न्यावे लागते, असे दृष्टीत्पत्तीस येते•

3•33 सर्वसाधारणपणे आश्रमशाळेतील मुलांना आजार होऊ नये म्हणून वैद्यकिय अधिकारी व खाजगी डॉक्टरांनी काही सूचना केल्या आहेत त्या येणेप्रमाणे :-

1• सकाळी वेळेवर शौच, मुखमार्जन व हातपाय स्वच्छ धुणे, मुखमार्जन करताना दात घासणे, 2• दररोज नियमाने आंघोळ करणे साबण लावून अंग चोळून स्नान करणे• 3• कपडे नेहमी स्वच्छ ठेवणे• 4• हातापायांची नखे जास्त वाढवू नयेत व दातांनी कुरतडू नयेत• 5• पिण्याच्या पाण्यात क्लोरिन गोळयांचा वापर करावा, पाणी गाळून घ्यावे• 6• मोकळया हवेत नियमितपणे व्यायाम करावा• 7• मुख्याध्यापकांनी शाळेचा परिसर स्वच्छ ठेवावा• 8• विद्यार्थ्यांनी आपली जेवणाची भांडी स्वच्छ ठेवावीत• 9• शिळे अन्न खावयास देऊ नये• 10• विद्यार्थ्यांनी आपले अंथरूण, पांघरूण स्वच्छ ठेवावे• 11• शाळेच्या वसतीगृह चालकांनी विद्यार्थ्यांच्या जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्यांचा वापर करावा• 12 शाळेच्या वसतिगृह चालकांनी अति मसालेदार आहार देण्यावर बंदी घालावी• 13• आहारामध्ये कडधान्याचा वापर करावा• या व इतर अन्य प्रकारच्या सूचना देण्यात आल्या•

3•34 वरील सूचनांवर मुख्याध्याकांतर्फे कार्यवाही करण्यात आलेली आहे त्यातील मुद्दे असे :-

1• प्रत्येक दिवशी सकाळी परिपाठाच्या वेळी मुख्याध्यापक व शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेबाबत पाहणी करतात• 2• वर्ग 1 ते 4 पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे कपडे शाळेच्या बालवाडीच्या दाईमार्फत धुतले जातात• 3• खरूज झालेल्या मुलांना बेनझीन बेन्झोईट औषध लावण्यात येते•

3•35 काही सूचनांबाबत मुख्याध्यापकांच्या स्तरावर कार्यवाही करता येत नाही• त्याबाबत नुसता पत्रव्यवहार करता येणे शक्य आहे• काही आश्रमशाळांना स्वतंत्र इमारत व वसतीगृह नाही• ते होणे आवश्यक आहे• प्राथमिक आरोग्य केंद्रास विद्यार्थ्यांच्या आजाराबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे• काही शाळांनी प्रथमोपचार पेटीची मागणी वेळोवेळी केली आहे•

3•36 मुख्याध्यापकांच्या स्तरावर न होणा-या कार्यवाहीची दखल आदिवासी विकास अधिकारी यांनी घेतली आहे• ज्या शाळांची स्वतंत्र इमारत व वसतिगृह नाही, त्याबाबत आदिवासी विकास अधिका-यातर्फे संबंधित वरिष्ठ अधिका-यांना लिहिण्यात आले आहे• औषधांचा पुरवठा वर्षातून एक वेळेस केला जातो व तो अपुरा पडतो• खाजगी डॉक्टरांचे बील आदिवासी विकास अधिका-यातर्फे मंजूर करण्यात येते• काही शाळांना अपुरा पाण्याचा पुरवठा होतो•

त्याबाबतही मुख्याध्यापकांतर्फे व आदिवासी विकास अधिका-यातर्फे वरिष्ठांकडे कार्यवाही करण्यात आली आहे.

3.37 तपासणीनंतर वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र राजूर व इतर वैद्यकिय अधिकारी यांनी औषधी देण्याच्या प्रमाणाबद्दल मार्गदर्शन केले आहे. सर्वसाधारणपणे वैद्यकिय अधिकारी रोग्यांच्या वयोगटानुसार द्रवरूप औषध अथवा गोळ्या देण्याचे प्रमाण ठरवतात. काही औषधी गोळ्यांच्या औषधांचे प्रमाण खाली दिले आहे.

क्लोरीक्वीन गोळ्या :- वयोगट 1 ते 6 (2 गोळ्या) 6 ते 10 (3 गोळ्या) 11 ते 16 (4 गोळ्या ) पॅरेसिटामोल गोळ्या 1 ते 5 अर्धी गोळी वयोगट 6 च्या पुढे 2 गोळ्या. मुलांचे डोळे आल्यास डोळ्यात टाकण्याचे द्रवरूप औषध प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत दिले जाते. सर्वच प्रकारची व उपयोगाची औषधे ही आश्रमशाळेच्या प्रथमोपचार पेटीत उपलब्ध होऊ शकत नाही व काही औषधे खाजगी डॉक्टरांकडे असू शकत नाही. ही सर्व काही प्रमाणात बाहेरून विकत आणण्यात येतात, असे निरीक्षणातून आढळून आले आहे.

3.38 वैद्यकिय अधिकारी आश्रमशाळेस दरमहा भेट देतात. त्यांना शक्य नसेल तर त्यांच्या अधिनस्त असलेला कर्मचारीवृंद (Para Medical staff) भेट देतो. या भेटी काही ठिकाणी अनियमित आहेत. भेटीअंती काही आजारी मुलांना औषधोपचार करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रास दाखल करण्यात येते. खाली दिलेल्या तक्त्यामध्ये वर्षवार किती विद्यार्थ्यांना ठराविक दिवसाच्या कालावधीत औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले याची माहिती दिली आहे.

तक्ता क्र•3•13

वर्षवार प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधोपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या कालावधीप्रमाणे विद्यार्थ्यांची संख्या

| वर्ष | विद्यार्थी संख्या विभागनिहाय | प्रवेश दिलेल्या कालावधीचो मर्यादा ﴾दिवसामध्ये﴿ | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1 ते 4 | 4 ते 8 | 8 ते 15 | 15 दिवसाच्या पुढे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1986 | सह्याद्री- 36 | 22 | 7 | 1 | 6 |
| | गोंडवन- - | -- | - | - | - |
| 1987 | सह्याद्री- 38 | 31 | 7 | - | - |
| | गोंडवन- 6 | 6 | - | - | - |
| 1988 | सह्याद्री 41 | 41 | - | - | - |
| | गोंडवन 1 | -- | 1 | - | - |
| 1989 | सह्याद्री 44 | 39 | 5 | - | - |
| | गोंडवन 58 | 57 | 1 | - | - |
| 1990 | सह्याद्री 79 | 63 | 16 | - | - |
| | गोंडवन 10 | 10 | | - | - |

3•39 उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे अचानक आजारी पडलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकिय उपचारासाठो प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आवश्यकता असेल तेवढ्या कालावधीपर्यंत दाखल करून घेण्यात येते•

3•40 आरोग्य विभागामार्फत साधारणतः 25 टक्के आश्रमशाळेमध्ये विशेष आरोग्य कार्यक्रम राबवण्यात आले आहेत• या कार्यक्रमाचा तपशील थोडक्यात खालीलप्रमाणे देण्यात येत आहे•

3•41 शल्य चिकित्सक अकोला कार्यालयातर्फे नेत्र रोग व मुख रोगाबाबतचे शिबिर घेऊन 268 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व औषध पुरवठा करण्यात आला• एका शिबिरामध्ये गलगंड व जंताविषयी माहिती देण्यात आली• त्याचप्रमाणे आरोग्य विभाग, नांदेड मार्फत आश्रमशाळेतील शिक्षकांना आरोग्य विषयक प्रशिक्षण देण्यात आले• गडचिरोली जिल्हा आरोग्य खात्यामार्फत लसीकरणाचा कार्यक्रम पूर्ण करण्यात आला• भंडारा येथील आश्रमशाळेमध्ये आरोग्य विभागामार्फत 16•8•91 ते 31•8•91 या कालावधीमध्ये खरूज व चर्मरोग असलेल्या विद्यार्थ्यांना खास मोहिमेद्वारे औषधे परवठा करण्यात आला• जळगांव जिल्हा आरोग्य विभागातर्फे आश्रमशाळेमध्ये धनुर्वात प्रतिबंधक लस, कुष्ठरोग निदान कार्यक्रम व डोळे तपासणी इ•ची मोहीम हाती घेण्यात आली होती• पुणे आरोग्य खात्यातर्फे आश्रमशाळेत कुष्ठ रोगाबाबतचा स्लाईड शो मुलांना दाखविण्यात आला• कोल्हापूर आरोग्य विभागामार्फत आश्रमशाळेमध्ये आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली• सोलापूर आरोग्य खात्यातर्फे आश्रमशाळेमध्ये शारिरीक स्वच्छता शिबीरे आयोजित करण्यात आले होते• नाशिक आरोग्य खात्यातर्फे आश्रमशाळमध्ये फिल्म शो कार्यक्रम दाखविण्यात आला व कॉलरा, गेस्ट्रो, धनुर्वात प्रतिबंधक लस हे कार्यक्रम घेण्यात आले• औरंगाबाद आरोग्य विभागामार्फत आश्रमशाळेमध्ये आरोग्य शिबीर घेण्यात आले• जव्हार तालुका जि•ठाणे कॉटेज हॉस्पीटलमार्फत आश्रमशाळेमध्ये जंत व नेत्र चिकित्सा शिबिर घेण्यात आले• ठाणे आरोग्य विभागामार्फत आश्रमशाळेमध्ये रक्तदान शिबिर व नेत्ररोग शिबिर घेण्यात आले• ग्रामसफाई कार्यक्रम, रोग प्रतिबंधक शिबिरे भरविण्यात आली• दरवर्षी बहुसंख्य मुख्याध्यापकांकडून वैद्यकिय अधिकारी यांच्या भेटीचा अहवाल आदिवासी विकास अधिकारी यांना सादर करण्यात येतो

## प्रकरण 4 थे

### क्षेत्रीय पाहणी

4•1 साधारणतः मार्च-एप्रिल, 1992 मध्ये आश्रमशाळा विषयक विविध अंगी सर्व्हेक्षणाचे क्षेत्रीय काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले•

क्षेत्रीय पाहणीचे वेळेस खालील बाबी आढळून आल्या आहेत•

4•2 महाराष्ट्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या तपासणी, पर्यवेक्षण व संनियंत्रणात वाढ करण्याच्या उद्देशाने आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या ठाणे, नाशिक, चंद्रपूर, धुळे व यवतमाळ जिल्ह्यांमधील पंचायत समितीमध्ये एक वेगळा संनियंत्रण कक्ष स्थापन केला आहे• शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते क्र•टिएसपी-1381/{ईडी} 472 यु•यो•/15, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई दि•27 मे, 1981 अन्वये प्रत्येक आदिवासी विकास गटामध्ये गट शिक्षणाधिकारी, भाग शिक्षणाधिकारी, वरिष्ठ कारकून, कनिष्ठ कारकून, शिपाई इ•पदे समाविष्ट असलेली एक शैक्षणिक तपासणी शाखा निर्माण करण्यात आली आहे• या शाखेचा सर्व पदांचा वेतन, भत्ते व इतर कार्यालयीन खर्च आदिवासी उपयोजनेच्या तरतूदीमधूनच केला जातो•

**मूळ उद्देश** :- जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्यानंतर शिक्षण अधिका-यांच्या जबाबदा-यामध्ये वाढ होत गेली• शिक्षण अधिका-यांकडे माध्यमिक शाळांची तपासणी, प्राथमिक शाळेचे व्यवस्थापन व शाळा तपासणी, शाळाबाह्य 9 ते 14 या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठीच्या शाळांची तपासणी, प्रौढ साक्षरता कार्यक्रम व जिल्ह्यातील इतर शैक्षणिक कार्यक्रम इ•जबाबदारीची कामे होती• त्यानंतर शैक्षणिक संस्थांच्या संख्येमध्ये वाढ होत गेली• त्यामुळे शिक्षणाधिका-यांना प्राथमिक शाळांच्या तपासणी, भेटी व संनियंत्रणाच्या कामासाठी वेळ मिळेनासा झाला• त्याचप्रमाणे सुधारीत अभ्यासक्रमाचा अवलंब व शिक्षणामध्ये घेतला गेलेला इतर विस्तार कार्यक्रम व प्राथमिक शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणा करण्याचे विविध प्रयत्न यामुळे शिक्षण खात्याच्या कामामध्ये भरीव वाढ होत गेली• प्राथमिक शिक्षणाच्या गुणात्मक सुधारणेसाठी तपासणी/पर्यवेक्षणाची/मार्गदर्शनाची आवश्यकता वरचेवर भासू लागली• राज्य अंदाज समितीतर्फे ही बाब शिक्षण संचालनालयाच्या निदर्शनास वरचेवर आणून देण्यात आली• प्राथमिक शिक्षणामध्ये कमी होऊ लागलेल्या गुणवत्तेच्या प्रमाणामध्ये वाढ करण्यासाठी व त्यामध्ये

गुणात्मक रितीने वाढ होण्यासाठी एक स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा जिच्यामुळे तपासणी/पर्यवेक्षण/संनियंत्रण कामामध्ये भरीव वाढ होऊ शकेल, अशी यंत्रणा निर्माण करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला•

प्रस्तुत शिक्षणामध्ये अमुलाग्र सुधारणा करणे, शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करणे, इ•उद्देश समोर ठेऊन सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये राज्याच्या 296 विकास गटामध्ये ही शैक्षणिक पर्यवेक्षण, तपासणी व संनियंत्रण शाखा निर्माण करण्यात आली• राज्यातील आश्रमशाळा योजना पूर्वी 1 एप्रिल 1975 पर्यंत शिक्षण खात्याकडे होती• नंतर 1 एप्रिल, 1975 पासून ही योजना समाज कल्याण खात्याकडे हस्तांरतीत करण्यात आली होती• तदनंतर ही आदिवासी विकास खात्याकडे हस्तांतरीत करण्यात आली होती• तरी पण शैक्षणिक तपासणी, मार्गदर्शन, पर्यवेक्षण व संनियंत्रण हे अद्यापपर्यंत शिक्षण खाते शासन निर्णय क्र•इबीजो-2571/बी (सी), दि•11•4•1975 नुसार शिक्षण खात्याकडेच आहे• राज्यातील आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील शासकीय व निमशासकीय आश्रमशाळांचे पर्यवेक्षण, तपासणी व संनियंत्रणाचे काम यामुळे या शाखेकडे सोपविण्यात आले होते• कारण याबाबतच्या खर्चाची तरतूद आदिवासी उपयोजनेच्या तरतूदीमधून करण्यात आली आहे•

त्याप्रमाणे राहिलेल्या इतर आदिवासी जिल्हयांमध्ये व राज्यातील राहिलेल्या सर्व जिल्हयामध्ये 1982 व 1983 मध्ये क्रमाक्रमाने खालील वेगवेगळया शासन निर्णयान्वये ही शैक्षणिक, पर्यवेक्षण, तपासणी व संनियंत्रण शाखा कार्यरत आहे•

1• समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते, शासन निर्णय क्र•वेएसपी-1382/ईडी/422/15, मंत्रालय, मुंबई, दि•1 जून, 1992

2• शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र•वेएसपी-1381/ईडी-472/यूओ/15• दि•3•8•1981

3• शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजना विभाग क्र•डीईई-1079/204132/(2524) कशा-5, दि•10•5•1982

4• शासन पत्र क्र•पीएसएस-1083/31262/19, दि•10•2•1983 शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

5• शासन पत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र•डीईई-1183/153658/3767/प्रशा-5, दि•14•2•1983

6• महाराष्ट्र शासन पत्र शिक्षण संचालक पत्र क्र•प्राशिप-1083/31262/19, दि•19•2•1983

7• महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्र•डीईई-1284/35508/4288/प्रशा-1, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई, दि•7 मे, 1984

उपरोक्त शासन निर्णयान्वये आश्रमशाळांची व शिक्षण संचालनयालयातील प्राथमिक शाळा तपासण्याचे, पर्यवेक्षणाचे व संनियंत्रणाचे कामासाठी आदिवासी उपयोजनेच्या तरतूदीमधूनच आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये गट शिक्षणाधिकारी, भाग शिक्षणाधिकारी इ•पदे निर्माण केली आहेत• असे असताना क्षेत्रीय पाहणीचे वेळेस त्या भागातील गट शिक्षणाधिकारी व भाग शिक्षणाधिकारी यांनी शिक्षण विभागामध्ये दैनंदिन कामाच्या वाढत्या व्यापामुळे आश्रमशाळा तपासण्याच्या व शैक्षणिक मार्गदर्शनाच्या कामात वेळ अपूरा पडतो असे विधान करणे निश्चितच खेदजनक आहे• शिक्षण संचालनालयाने ही बाब वेळोवेळी गट शिक्षणाधिका-यांच्या व भाग शिक्षणाधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावी अशी अपेक्षा आहे•

उपरोक्त बाबीस अनुसरून पंचायत समिती, धारणी येथे भाग शिक्षणाधिका-यांची 8 पदे मंजूर आहेत• त्यापैकी 5 पदे भरलेली आहेत व 3 पदे रिक्त आहे• शिक्षण क्षेत्रामधील जास्तीत जास्त शाळांना भेटी व मार्गदर्शन करण्यासाठी राहिलेली 3 पदे भरणे अपरिहार्य आहे, असे वाटते• ज्या ज्या पंचायत समितीमधील शिक्षणाधिका-यांची पदे रिक्त असतील ती पदे भरणे आवश्यक आहे•

4•3 आश्रमशाळांची शैक्षणिकदृष्टया तपासणी करणारे व भेटी देणारे भाग शिक्षणाधिकारी हे प्रामुख्याने आदिवासी विकास विभागामार्फतच असावेत• पूर्वी आदिवासी उपयोजनेच्या तरतूदीमधून जिल्हा परिषदाअंतर्गत जी शैक्षणिक पर्यवेक्षण/मार्गदर्शन शाखा शासनाने निर्माण केली आहे, त्यातील काही भाग शिक्षणाधिका-यांची पदे आदिवासी विकास विभागाअंतर्गत जोडण्यात यावीत अथवा आदिवासी विकास विभागामार्फतच अनुदानित आश्रमशाळांची जी वाढ होत आहे, त्यासाठी आश्रमशाळा तपासणी शाखा स्वतंत्र असणे आवश्यक आहे• दरवर्षी आश्रमशाळांची होणारी वाढ लक्षात घेऊन आदिवासी विकास विभागाने ह्या बाबींचा विचार करावा• आश्रमशाळांच्या शैक्षणिक मार्गदर्शन व भेटींच्या संदर्भात शिक्षण विभागाच्या भाग शिक्षणाधिका-यातर्फे शिक्षण विभागामध्ये सध्या जास्तीची बरीचशी कामे करावी लागतात, असे प्रतिपादन केले हाते• त्यामुळे हे काम आदिवासी विकास विभागामार्फतच करण्यात यावी, अशी सूचना करावी असे वाटते•

4·4 मासिक गट संमेलनामध्ये सर्वच आश्रमशाळांचा व शिक्षकांचा सहभाग असावा· सह्याद्री विभागातील 91 टक्के आश्रमशाळांची व गोंडवन विभागातील 47 टक्के आश्रमशाळांनी गट संमेलने भरविली आहेत· राहिलेल्या आश्रमशाळांनी गट संमेलने भरविण्यासाठी प्रयत्न करावेत· विशेषतः दुर्गम भागातील आश्रमशाळांनी गट संमेलने भरविण्यासाठी कार्यवाही करावी·

4·5 शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीस अनसुरुन शासनाने प्रत्येक खेडयामध्ये राज्य शिक्षण समितीची स्थापना व्हावी, असे सूचित केले आहे· त्याप्रमाणे ग्राम शिक्षण समित्या स्थापन झालेल्या आहेत· या ग्राम शिक्षण समित्यांच्या सभा नियमितपणे झाल्या पाहिजेत, अशी अपेक्षा आहे· वस्तुस्थिती अशी आहे की, या समित्यांच्या सभा काही ठिकाणी नियमितपणे होत नाहीत· या समित्यातर्फे घटक नियोजन, वार्षिक नियोजन, दैनिक टांचण इ· शैक्षणिक बाबी नियमितपणे होतात किंवा नाही हे पाहणे अपरिहार्य वाटते· मुख्याध्यापकांच्या व शिक्षकांच्या विविध अडी-अडचणीबाबत या सभेमध्ये उहापोह होऊ शकतो·

4·6 प्रत्येक आश्रमशाळेमध्ये किमान कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे· मुलांना किंवा मुलींना राष्ट्रगीत व इतर समाज प्रबोधनपर गीते म्हणता आली पाहिजेत· शाळेचा नकाशा व इतर काही नकाशे संग्रही असणे आवश्यक आहे· काही शाळांमध्ये या बाबींची पूर्तता नाही, असे दिसून आले आहे·

4·7 काही शाळेमध्ये मातृप्रबोधन प्रकल्पाची आखणी केल्याचे आढळून आले नाही· स्त्री शिक्षकांनी संक्रात वगैरे सारख्या सामाजिक कार्यक्रमांद्वारे मुलांच्या मातांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे हे होय·

**मुलांचे कुपोषण थांबविण्यासाठी सकस आहार वाटप कार्यक्रम :-**

4·8 या कार्यक्रमांतर्गत दूध व सुकडी वाटप करण्यात येते· दूध व सुकडी 1 ते 4 वर्गातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येते· या कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य रितीने झाली पाहिजे अशी अपेक्षा आहे·

4·9 विद्यार्थ्यांच्या बुध्दीमत्तेची चाचणी आजमावण्यासाठी "क्षमता चाचणी" घेणे अपरिहार्य आहे· ही चाचणी वर्ग-1 व 2 च्या विद्यार्थ्यांसाठी आहे· शाळांमधून शिक्षण सुधार कार्यक्रमाचा अवलंब होण्याच्या दृष्टीकोनातून ही पध्दत आवश्यक ठरते·

4·10 आश्रमशाळांतील इ· 1 ते 4 पर्यंत असलेल्या मुलांना प्रवेश दिल्यानंतर योग्य ते

प्रेम व जिव्हाळा शिक्षकांकडून मिळत नाही. त्यामुळे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढत जाते, असे विचार एका सामाजिक कार्यकर्त्याने व्यक्त केले आहेत. हे प्रमाण कमी होण्यासाठी गांवोगांवी पाळणाघरे असणे आवश्यक आहे. ही पाळणाघरे प्रामुख्याने खाजगी संस्थामार्फत चालवावीत. बालवाडी, पाळणाघरे इ. मध्ये शिक्षकांची नियुक्ती करतांना बहुतांश स्त्रियांचाच समावेश असावा त्यामुळे शिक्षण सुधार कार्यक्रमास मदत होईल व गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

4.11 मावळ भागातील विकास गट क्षेत्रामध्ये मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र आश्रमशाळेची मागणी केली आहे. त्याबाबत शासनाने विचार करावा.

4.12 विद्यार्थ्यांसाठी आरोग्य पत्रके ब-याचश्या आश्रमशाळेमध्ये ठेवण्यात येत नाहीत. शासनाने ठरवून दिलेल्या आरोग्य पत्रकाचा विशिष्ट नमुना आहे. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांची मूलभूत बाबींची व आजाराबाबतची माहिती भरण्यात येते. हे पत्रक कोणाकडे असावे याबाबत मतभिन्नता आढळून येते. वास्तविक पाहता ही आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. त्यांनी वैद्यकिय अधिकारी जेंव्हा आश्रमशाळेस भेट देतील, तेंव्हा ही "आरोग्य पत्रके" उपलब्ध करून द्यावीत. वैद्यकिय अधिकारी या आरोग्य पत्रकांवर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नोंदी ठेवतील.

4.13 काही आश्रमशाळांना अशुध्द पाणीपुरवठा होतो, त्यामुळे मुलांचे आरोग्य नीटपणे जोपासले जात नाही. परिणामी निरनिराळे रोग उद्भवात. काही आश्रमशाळामधून नियमितपणे पाणी उपलब्ध होत नसल्यामुळे मुलांना स्नानासाठी ओढ्यावर व लांब अंतरावर जावे लागते अशी परिस्थिती आहे. बरीचशी मुले नियमितपणे आंघोळ घेत नाहीत. याचा परिणाम त्यांचे आरोग्य बिघडण्यावर होतो. शासनाने वसतीगृह असलेल्या शासकीय आश्रमशाळेची व इतर अनुदानित आश्रमशाळांची पिण्याच्या पाण्याची व आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी लागणा-या पाण्याची व्यवस्था करणे क्रमप्राप्त आहे, असे निदर्शनास येते. अनुदानित आश्रमशाळेच्या संस्थाचालकांस व व्यवस्थापकास या बाबींची समज देणे अपरिहार्य आहे, असे वाटते.

4.14 आदिवासी विभागातील ग्रामीण रूग्णालयातील आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिका-यांनी व त्यांच्या अंतर्गत काम करणा-या वैद्यकिय कर्मचा-यांनी (Para Medical Staff) आश्रमशाळेतील मुलांची वैद्यकिय तपासणी नियमितपणे घेत जावी, असे सुचविण्याची गरज आहे, असे वाटते. क्षेत्रीय पाहणीच्या वेळेस काही ठिकाणी या अधिका-यांच्या भेटी अनियमितपणे आहेत, असे निदर्शनास आले आहे. विशेषतः अति दुर्गम भागामध्ये अशाप्रकारच्या भेटी अनियमित आहेत.

4.15 वास्तविक पाहता सन 1979-80 या दरम्यान आदिवासी उपयोजनाअंतर्गत व त्याच योजनेच्या तरतूदीमधून काही ग्रामीण रूग्णालये व काही प्राथमिक आरोग्य केंद्रे

निर्माण करण्यात आली आहेत. काही ग्रामीण रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे ज्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली आहेत, त्याबाबत खालील शासन निर्णय देण्यात येत आहे

1. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते क्र.टीएसपी-1079/1089/यूओ/डी-16, दि.27.9.1979 अन्वये तळोदा जि.धुळे येथे ग्रामीण रूग्णालय आदिवासी उपयोजनेअंतर्गत स्थापन करण्यात येऊन त्यासाठी वैद्यकिय अधिकारी व त्याखालीली वैद्यकिय कर्मचारी वर्ग (Para Medical Staff ) ची पदे निर्माण करण्यात आली होती.

2. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते शा.नि. क्र.टीएसपी-1080/568/यूओ/ दि.28.8.80 व 31.1.81 अन्वये आदिवासी उपयोजनेअंतर्गत तलासरी, जि.ठाणे, खंबाला, ता.इगतपूरी, जि.नाशिक, नवापूर, जि.धुळे, अहमदनगर पाटण, ता.वणी, जि.यवतमाळ येथे 30 बेडस् असलेली 5 ग्रामीण रूग्णालये निर्माण करण्यात आली. त्यासाठी वैद्यकिय अधिकारी वर्ग-1 व इतर वैद्यकिय कर्मचारीवृंद (Para Medical Staff) बाबतची पदे निर्माण करण्यात आली होती.

3. त्याचप्रमाणे समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते, शासन निर्णय क्र.टीएसपी-1079/166/यूआरे/डेस्क-16, दि.16.10.79 व 18.10.79 अन्वये आदिवासी उपयोजनेअंतर्गत 1§ सायवन, ता.डहाणू, जि.ठाणे 2§ परळी, ता.वाडा, जि.ठाणे 3§ खर्डी, ता.शहापूर, जि.ठाणे 4§ सोमते, ता.पालघर, जि.ठाणे 5§ रगडी, जि.गडचिरोली 6§ भामरागड, ता.सिरोंचा, जि.गडचिरोली 7§ कमलापूर, ता.सिरोंचा, जि.गडचिरोली 8§ उल्लेख नाही 9§ एलियाबाद, ता.बागलाण, जि.नाशिक 10§ सातेगांव, ता.गोंदिया, जि.भंडारा 11§ रामपूर, ता.केळापूर, जि.यवतमाळ 12§ मेथीखेडा, ता.यवतमाळ, जि.यवतमाळ 13§ विसारवाडी, ता.नवापूर, जि.धुळे व 14§ सोमवल बु.ता.तळोदा, जि.धुळे येथे त्यासाठी वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारीवृंद (Para Medical Staff)ही पदे 14 प्राथमिक आरोग्य केंद्रासह सुरू करण्यात आली होती.

4. याशिवाय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते, शासन निर्णय क्र.टीएसपी-1080/558/यूओ/डेस्क-16, दि.14.2.1980 अन्वये आदिवासी उपयोजना अंतर्गत दोन नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र 1§ खांडस, जि.कुलाबा व 2§ केसोरी, जि.भंडारा येथे अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी, वैद्यकिय कर्मचारी वर्ग § Para Medi.Staff§ यांचे पदे निर्माण करून

सुरु करण्यात आली होती• याशिवाय उपरोक्त ग्रामीण रुग्णालयांना व प्राथमिक आरोग्य केंद्राना आवश्यक असलेल्या वाहनांची व्यवस्था खालील शासन निर्णयाद्वारे करण्यात आली होती•

5• त्याचप्रमाणे समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते शासन निर्णय क्र•टिएसपी-1079/419/डेस्क-16/16, दि•12•11•79, 19 शासकीय वाहनांच्या खरेदीसाठी आदिवासी उपयोजनाअंतर्गत तरतूदीमधून या शासकीय वाहनांचा वापर प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यास संलग्न असलेल्या ग्रामीण नियोजन केंद्रासाठी करण्यासाठी करण्यात येतो•

6• त्याचप्रमाणे समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन खाते शासन निर्णय क्र•1080/1910/यूओ/डेस्क-16, दि•3•9•80 ठाणे, धुळे, यवतमाळ व भंडारा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत तरतूदीमधून 9 शासकीय वाहने खरेदी करण्यासाठी तरतूद केली होती•

7• प्रत्येक ग्रामीण रुग्णलयास जोडून एक फिरते आरोग्य पथक आदिवासी भागामध्ये नेहमी कार्यरत राहील• या फिरत्या आरोग्य पथकामध्ये एक वैद्यकिय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, नर्सेस इ•चा शासकीय वाहनासह समावेश असेल•

8• आदिवासी भाग मागासलेला व दुर्गम असल्यामुळे वाहन दुरुस्तीविषयक अडचणी लक्षात घेऊन शासनाने 5 फिरते शासकीय वाहन देखभाल व दुरुस्तीबाबत पथके निर्माण केली आहेत• ही पथके आदिवासी भागातील नादुरुस्त शासकीय वाहनांची दुरुस्ती करतील•

9• याशिवाय ग्रामीण व कुटीर रुग्णालयांना ग्रामीण भागातील रुग्णांची ने आण करण्यासाठी शासकीय ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात आली आहे•

आदिवासी उपयोजनेच्या तरतूदीमधून निर्माण करण्यात आलेली 6 कुटिर रुग्णालये, 14 ग्रामीण रुग्णालये, 76 प्राथमिक आरोग्य केंद्र व पूर्वीच्या आदिवासी विकास गटामार्फत सुरु करण्यात आलेली 30 प्राथमिक आरोग्य केंद्र व 58 ग्रामीण कुटुंब नियोजन केंद्रे यांचा प्रमुख व मूलभूत उद्देश म्हणजे आदिवासी उपयोजना कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणा-या आदिवासी जनतेला योग्य व चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हा होय• त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र व कुटीर रुग्णालयाद्वारे शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील मुलांच्या आरोग्याची तपासणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच सोपविण्यात आलेली आहे•

असे असताना आश्रमशाळांमधील मुलांची आरोग्य तपासणी वेळेवर होत नाही, ही चिंतेची बाब आहे. विशेषतः पर्जन्य कालावधीमध्ये आदिवासी भागात वैद्यकिय सोई व आश्रमशाळेच्या मुलांची वैद्यकिय तपासणी नियमितपणे होणे अत्यंत गरजेचे आहे. आदिवासी भागातील दुर्गम भागामध्ये या कालावधीमध्ये दुर्लक्ष होते, असा अनुभव प्रत्ययास येतो. आरोग्य अधिका-यांनी व त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांनीही या शाळांना नियमितपणे भेटी द्याव्यात अशी अपेक्षा आहे. आरोग्य संचालकांची ही बाब जिल्हा आरोग्य अधिका-यांच्या व वैद्यकिय अधिका-यांच्या वेळोवेळी निदर्शनास आणून देत जावी, असे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे जिल्हा आरोग्य अधिका-यांनी प्रत्येक महिन्यामध्ये आश्रमशाळांमध्ये वैद्यकिय अधिका-यांच्या/कर्मचा-यांच्या तपासणी/भेटी वगैरे वेळेवर होतात किंवा नाही याबद्दलचा उहापोह त्यांच्या मासिक सभामधून व्हावा, असे या संस्थेचे अभिप्राय आहेत.

# प्रकरण 5 वे

## विविध सूचना व त्यावर आधारीत निष्कर्ष व समारोप

5•1 आश्रमशाळेमधील शिक्षण व वैद्यकिय विभागातील अधिका-यांच्या तसेच आदिवासी विकास विभागातील प्रशासकीय अधिका-यांच्या, शैक्षणिक, वैद्यकिय व प्रशासकीय तपासणी व भेटीबाबतची ही पाहणी आहे• या अधिका-यांच्या तपासणी व भेटी नियमित आहेत पण काही थोडया आश्रमशाळेमध्ये त्यांचा तपासणी व भेट कार्यक्रम अनियमित आहे• त्यामागे विविध कारणेही असू शकतील• या पाहणीवर आधारीत काही सूचनांचा उहापोह या प्रकरणामध्ये करण्यात आला आहे•

5•2 शिक्षण खात्यातील सध्याच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेऊन या ठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की, आदिवासी विकास विभागामार्फत भाग शिक्षणाधिका-यांची पदे भरली जावीत असे वाटते• सध्याचे भाग शिक्षणाधिकारी हे जिल्हा परिषद, पंचायत समितीमार्फत काम करणारे आहेत• शासकीय व अनुदानित आश्रमशाळा या राज्य शासनाच्या अंतर्गत काम करीत आहेत• त्यामुळे जिल्हा परिषदेतील अधिकारी राज्य शासनाच्या अंतर्गत असलेल्या आश्रमशाळांची तपासणी करतात ही बाब थोडी भावनात्मक वाटते• याशिवाय काही भाग शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी, त्यांनी भेटीअंती केलेल्या सूचनांची अंमलबजावणी होत नाही, असे प्रतिपादन करतात• त्यामुळे या तपासणी यंत्रणेमध्ये आदिवासी विकास विभागाचीच एक वेगळी शैक्षणिक तपासणी व मार्गदर्शन यंत्रणा होणे अपरिहार्य आहे, असे वाटते• या कार्यवाहीची त्वरीत अपेक्षा आहे•

5•3• आश्रमशाळेतील उपरोक्त तपासणी यंत्रणेमध्ये आदिवासी विकास विभागाच्या भाग शिक्षणाधिकारी वगैरेची नियुक्ती होईपर्यंत इथे असे नमूद करावेसे वाटते की, पंचायत समित्यामधील भाग शिक्षणाधिका-यांची असलेली रिक्त पदे त्वरीत भरण्यात यावीत• कारण तपासणी यंत्रणेचे काम अव्याहतपणे चालू राहणे ही शैक्षणिक दर्जा सुधारणेच्या दृष्टीने आवश्यक बाब आहे•

5•4• वसतिगृह व आश्रमशाळांचे प्रशासन स्वतंत्रपणे असावे, असे वाटते• वसतीगृहाचे काम कार्यालयीन अधीक्षक पाहतात तर काही ठिकाणी शिक्षक पाहतात• त्यामुळे त्यांचे स्वतःच्या कामाकडे दुर्लक्ष होत आहे असे या ठिकाणी दृष्टोत्पत्तीस येते• याशिवाय प्रस्तुत व्यवस्था अंतर्गत कलहास वाव देणारी आहे•

5•5 आश्रमशाळांच्या सर्व शिक्षकांना निवासगृहे उपलब्ध करून द्यावीत• सध्या ब-याच

शाळांमधून काही शिक्षक, कर्मचारी नजिकच्या गांवात अथवा दूर अंतरावर राहतात• रात्रीचे जादा वर्ग घेण्यास शिक्षकांना त्यामुळे मदत होईल•

5•6 शिक्षण विभागाच्या बहुतेक अधिका-यांनी आश्रमशाळेसाठी क्रीडांगण असावे, अशी सूचना केली आहे• मुलींचे आरोग्य, दररोज काहीतरी शारिरीक श्रम, कवायत, वगैरे यावर अवलंबून आहे• मुलांना खेळासाठी तासिका आवश्यक आहे व शाळेला एक क्रीडा शिक्षकाची नियुक्तीपण गरजेची आहे• आदिवासी विकास विभागाने या बाबीवर वरिष्ठ पातळीवरुन विचार करुन योग्य निर्णय घ्यावा• या योजनेबाबतची कार्यवाही अपेक्षित आहे• खेळामध्ये प्राविण्य मिळणा-या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा शिष्यवृत्ती देणे अपरिहार्य ठरते• काही शाळांमधून क्रीडा साहित्यांचाही अभाव आहे•

5•7 आश्रमशाळेतील शिक्षकांना विविध मार्गदर्शन व सूचना मिळतात• त्यासाठी सर्वच्या सर्व आश्रमशाळांमधून गट संमेलने भरविण्यासाठी प्रयत्न व्हावेत• विशेषतः दुर्गम भागातील आश्रमशाळेमध्ये गट संमेलने भरविण्यासाठी अग्रक्रम द्यावा, असे सुचवावसे वाटते•

5•8 आश्रमशाळेच्या शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी शाळा सुरु होण्यापूर्वी वार्षिक अभ्यासक्रम {नियोजन} व घटक नियोजन पूर्ण केले पाहिजे• याशिवाय शैक्षणिक साहित्य व स्वयं अध्यापन साहित्य तयार केले पाहिजे• शिक्षकांनी आत्मियतेने कार्य करावयास हवे•

5•9 आश्रमशाळेतील शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची अंत्यंत आवश्यकता आहे• सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे, अध्यापन करणे, वेळेवर जेवण घेणे व वेळेवर झोप घेणे इ•बाबी नित्य नियमितपणे होणे अपरिहार्य आहे• त्याचप्रमाणे मुख्याध्यापकांनी विद्यार्थी व शिक्षकांवर कडक नजर ठेवून त्यांच्यामध्ये भावनात्मक ओलावा ठेवणे आवश्यक आहे•

5•10 शिक्षण सत्राचे मध्यावधी कालावधीमध्ये करण्यात येणा-या बदल्यांचे सत्र बंद करण्यात यावे• शिक्षकांच्या बदल्या शैक्षणिक वर्षाचे सुरवातीसच व्हाव्यात•

5•11 विद्यार्थ्यांचे अध्यापन मनोरंजक पध्दतीने करण्यात यावे• शैक्षणिक साधनांचा उपयोग आस्थापनामध्ये करावा• विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुखसोयी पुरवाव्यात• त्यांच्या अडी-अडचणी समजावून घेण्याचा योग्य तो प्रयत्न व्हावा•

5•12 "माडिया गोंड बोली" आदिवासी बोलीभाषा प्रकल्प शासनाने 1984 मध्ये हाती घेतलेला आहे• त्याचप्रमाणे इतर आदिवासी बोलीभाषा-मराठी प्रकल्प शासनाने राबवून ग्रामीण विभागामध्ये बालवाड्या सुरु कराव्यात म्हणजे शैक्षणिक दर्जा सुधारण्यामध्ये

मदत होऊ शकेल, असे वाटते. त्याचप्रमाणे धारणी विभागामध्ये आदिवासी भाषा कोरकू आहे. हा प्रदेश मध्यप्रदेशाच्या हिंदी भाषिकांलगत असल्यामुळे या विभागामध्ये काही शाळेचे माध्यम "हिंदी" ठेवल्यास शैक्षणिक प्रगती साधता येऊ शकेल.

5.13 आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी पालकांना ज्यांची मुले अनाधिकृत गैरहजर राहत असतील त्यांना वारंवार पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणाचे महत्व पटवून देऊन, शाळेत नियमितपणे हजर राहणेबद्दलचा प्रयत्न करावा.

5.14 आश्रमशाळेत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. निर्जंतुकीकरण केलेले पाणी शक्यतो पुरविण्यात यावे. स्नान व कपडे धुण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी पुरविणे आवश्यक आहे.

5.15 स्वयंपाकासाठी भांडी कल्हई केलेली असावीत अथवा स्टीलच्या भांडयाचा पुरवठा करावा.

5.16 किरकोळ उद्भवणा-या आजारासाठी आश्रमशाळेत "Medicine Kit" असावी.

5.17 आश्रमशाळेचे विद्यार्थ्यांसाठी "आरोग्य पत्रके" ( Health cards ) ठेवणे आवश्यक बाब आहे. आरोग्य पत्रकामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य विषयक माहिती असते. विद्यार्थ्यांचे वजन, उंची, छाती, विद्यार्थ्यांस उद्भवणारा रोग इ.प्रकारची निरनिराळी माहिती नोंदविलेली असते. आरोग्य अधिका-यांकडे व मुख्याध्यापकांमध्ये ही कार्डे ठेवण्याबाबत मतभेद आहेत. विद्यार्थ्यांबाबतची प्राथमिक माहिती ठेवणे ही मुख्याध्यापकाची प्राथमिक जबाबदारी असल्यामुळे मुख्याध्यापकांनी ही कार्डे तयार करावीत व वैद्यकिय अधिका-यांच्या भेटीच्या वेळेस त्यांच्याकडून भरुन घ्यावीत.

5.18 आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्याबाबतची काळजी घेणे हे मुख्याध्यापकाचे महत्वाचे काम आहे. दररोज प्रार्थनेच्या वेळेस प्रत्येक विद्यार्थ्यांची नखे व केस तपासणी महत्वाचे होय. याशिवाय त्यांच्या स्नानाबाबतची व्यवस्थाही वसतीगृह चालकाने पाहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना आरोग्य शिक्षण ( Health Education) ही महत्वाची बाब आहे.

5.19 नाशिक, ठाणे, धुळे, जळगांव, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, व चंद्रपूर या जिल्हयांमध्ये आश्रमशाळांची संख्या इतर जिल्हयांपेक्षा जास्त असल्यामुळे वैद्यकिय तपासणीकरिता एक वैद्यकिय अधिकारी स्वतंत्रपणे नियुक्त करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. याशिवाय या जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील आश्रमशाळेस भेटी देण्यासाठी आरोग्य खात्याने विशेष वाहने उपलब्ध करुन द्यावीत.

5•20 आश्रमशाळेमध्ये औषधी पेटीमध्ये § Medicine Kit § औषधांचा साठा पुरेसा उपलब्ध होत नसल्यामुळे ब-याच वेळेस बाहेरून औषधे मागवावी लागतात• सध्याचा औषधीसाठा अपूरा पडतो• त्यासाठी औषधाचा पुरेशा प्रमाणात पुरवठा करणे अगत्याचे आहे•

5•21 त्वचा रोग असलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती काळजी घेणे महत्वाचे आहे• त्यांना नियमितपणे औषधे पुरविणे व गरम पाण्याने आंघोळीची सुविधा प्राप्त करून देणे अत्यंत महत्वाचे आहे•

5•22 सर्वसाधारणपणे करमणुकीचा काही भाग व ज्ञानार्जनाचे माध्यम म्हणून दूरदर्शन संचाचा उपयोग होऊ शकतो• आदिवासी विकास विभागामार्फत शक्य झाल्यास दूरदर्शन संच प्रत्येक आश्रमशाळेस पुरविण्यात यावे, अशी अपेक्षा आहे•

5•23 विद्यार्थ्यांना चौरस आहार देणे महत्वाचे आहे• वैद्यकिय अधिका-यांच्या सूचनेनुसार हा आहार देण्यात यावा• हा आहार योग्य प्रमाणात असावा• आहारात पालेभाज्यांचा समावेश असावा• त्यामुळे मुलांच्या शरिरातील रक्तांमध्ये वाढ होऊन रोगराई नाहीशी होण्यास मदत होईल•

5•24 शासकीय खर्चामध्ये काटकसरीचे असलेले सध्याचे पर्व लक्षात घेऊन शासनास आश्रमशाळांसाठी अपु-या सोयी, इमारती नसणे, इमारती अपूर्ण स्थितीत असणे, शाळेमध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध नसणे, अपुरे क्रीडा साहित्य, पुस्तके गरजेवर आधारीत नसणे, प्रयोग शाळेचे अपुरे साहित्य या व इतर अनेक वसतिगृहाबाबतच्या अनेक मागण्या त्वरीत पुरवाव्यात, हे म्हणणे योग्य होणार नाही• तरी देखील आवश्यक तेवढया सोयी सुविधांकडे लक्ष द्यावे, असे सुचवावेसे वाटते•

5•25 शैक्षणिक दर्जा सुधारणे त्याचबरोबर आदिवासी विद्यार्थ्यांना व्यवसायावर आधारलेले शिक्षण देणे महत्वाचे आहे• त्यामुळे आदिवासींची आर्थिक प्रगती होऊ शकेल• आदिवासी विद्यार्थ्यांना सामान्य शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने पावले उचलली गेली पाहिजेत• या विद्यार्थ्यांकरिता व्यावसायिक शिक्षणाची विशेष अभिरुची आहे, असे आढळून आले आहे• त्यासाठी लघु उद्योग विषयक प्रशिक्षण, सुधारीत कृषी व्यवसायाभिमुख प्रात्यक्षिके, सुतारकाम, बांबूकाम, पुतळे, नक्षीकाम कलाकृतीबाबत शिक्षण, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इ•बाबींवर आधारलेले शिक्षण देण्यात यावे• त्यामुळे भावी काळात त्यांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती साधता येणे शक्य होईल•

**समारोप :-**

5•26 शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे, व्यावसायिक शिक्षण आवश्यक आहे, मुलांची गळती बंद होणे आवश्यक आहे, आश्रमशाळेत सोयी सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे• समाजापासून दूर असणा-या आदिवासींच्या बाबतीत शिक्षणाची प्राथमिक जबाबदारी भारतीय राज्य घटनेने शासनावर टाकली आहे• शासन त्यादृष्टीने प्रयत्नशील आहे• शासनाच्या मर्यादा व शासनापुढील अडचणी लक्षात घेता ह्याची दुय्यम जबाबदारी सर्व समाजावर येऊन पडते• त्यासाठी समाजाने कृती करणे अत्यंत आवश्यक आहे• त्याशिवाय शिक्षणाचा प्रश्न सुटणार नाही• उपरोक्त बाबी खर्चिक असल्यामुळे त्यावर केवळ शासन एवढा खर्च करु शकणार नाही• म्हणून अशाप्रकारच्या उपाययोजनासाठी शासनाबरोबरच समाज, समाजसेवी संस्था, दानशूर व्यक्ती, शिक्षक या सर्वांना आवाहन केले जावे व प्रत्येकाने आपला वाटा उचलावा म्हणजे बराच प्रश्न सुटेल, असे वाटते•

5•27 त्याचबरोबर आदिवासी जमातीतील ध्येयवादी तरुण पिढीने हे काम अंगावर घेतले पाहिजे व आपली संकुचित व अल्प समाधानी वृत्ती बाजूला ठेवून पुढे जाण्याची धडपड केली पाहिजे•

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

शासकीय आश्रमशाळेस वैद्यकिय अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी दिलेल्या भेटीचे मूल्यमापन पाहणी- 1991

प्रपत्र क्र•1

मुख्याध्यापकांनी भरावयाचे पत्रक :-

चौक क्र•1 : आश्रमशाळेची प्रास्ताविक माहिती : -

1• शासकीय आश्रमशाळेचे नांव : गांव :
तालुका :
जिल्हा :

2• शासकीय आश्रमशाळेत असलेल्या : विद्यार्थ्यांची संख्या

3• शासकीय आश्रमशाळेत कितवी पर्यंत वर्ग भरतात•

4• शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या : 1• प्राथमिक :
2• माध्यमिक :

5• आश्रमशाळेचे तालुका मुख्यालयापासून अंतर कि•मी•

6• आश्रमशाळेचे विस्तार अधिकारी कार्यालयापर्यंतचे अंतर व गांव कि•मी• गांव :

7• आश्रमशाळेचे प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंतचे अंतर व गांव कि•मी• गांव :

## चौक क्र•2 शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी दिलेल्या भेटीचे मूल्यमापन

1• शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी: होय/नाही
आश्रमशाळेला भेटी दिल्यात काय ?

भेटी दिल्या असल्यास पुढील
तपशील भरा

| अ•क्र• | अधिका-याचे नांव | 1988 | 1989 | 1990 | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | तारीख | तारीख | तारीख | |
| 1• | जिल्हा शिक्षणाधिकारी | | | | |
| 2• | उपशिक्षणाधिकारी | | | | |
| 3• | शिक्षण विस्तार अधिकारी | | | | |
| | भेटींची एकूण संख्या | | | | |

2• शाळेची प्रतवारी केव्हा
करण्यात आली ?

| अ•क्र• | प्रतवारी | 1988 | 1989 | 1990 |
|---|---|---|---|---|
| 1• | | | | |
| 2• | | | | |
| 3• | | | | |

3• शाळेची वार्षिक तपासणी 1991 महिना
मध्ये केव्हा करण्यात आली ? दिनांक-

4\. शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी वरील तपासणी कोणत्या सूचना केल्या ? व मुख्याध्यापकांनी काय कार्यवाही केली ते पुढील तक्त्यात भरा

---

सन : 1988

सूचना

---

कार्यवाही

---

---

सन : 1989

सूचना

---

कार्यवाही

---

---

सन : 1990

सूचना

---

कार्यवाही

---

5\. ज्या सूचनांवर कार्यवाही केली नाही, त्याची कारणे :-

1.
2.
3.

6• भेटी/तपासणी अंतर्गत ज्या सूचना केल्या त्यापैकी किती सूचना शैक्षणिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीने उपयुक्त होत्या ?

| अ•क्र• | उपयुक्त सूचना | 1988 | 1989 | 1990 |
|---|---|---|---|---|
| 1• | शैक्षणिक स्तर | | | |
| 2• | इमारत | | | |
| 3• | फर्निचर | | | |
| 4• | पुस्तके | | | |
| 5• | शिक्षकांना सूचना | | | |
| 6• | इतर सूचना | | | |

7• 1990 मधील वार्षिक परीक्षेत 25 टक्के पेक्षा कमी व 50 टक्के पर्यंत निकाल लागलेली माहिती द्या•

| अ•क्र• | विषय | इ•1 ते 4 | इ•5 ते 7 | इ•8 ते 10 | कमी निकाल लागण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| 1• | 25 टक्के पेक्षा कमी | | | | |
| 2• | 50 टक्के पेक्षा कमी | | | | |

8• कमी निकाल लागलेल्या शिक्षकांच्या बाबतीत सुधारणेच्या दृष्टीने शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी आढावा घेऊन काही सूचना केल्यात काय ? — होय/ नाही

9• शैक्षणिक साहित्याच्या अनुषंगाने: कोणत्या सूचना केल्या ?

1•
2•
3•

त्यादृष्टीने केलेले प्रयत्न

1•
2•
3

10• शिक्षण विभागाचे अधिकारी सर्वसाधारणपणे तपासणीचे वेळी किती काळ थांबतात• — तास

11• शिक्षकांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रांना शिक्षकांचा सहभाग

| अ•क्र• | साल | प्रशिक्षण सत्राचे नांव | कालावधी | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1• | 1986 | | | |
| 2• | 1987 | | | |
| 3• | 1988 | | | |
| 4• | 1989 | | | |
| 5• | 1990 | | | |

12. आपल्या बिटमध्ये गट संमेलने: होय/नाही
भरविली गेली आहे काय ?

असल्यास वर्षातून किती वेळा एक/दोन/तीन

13. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी
आयोजित केलेल्या पुढील बाबतीत
सहभाग घेण्याची संधी किती वेळा
प्राप्त झाली ?

| | 1 | 2 | 3 |
|---|---|---|---|
| 1. विज्ञान प्रदर्शन | ( ) | ( ) | ( ) |
| 2. आदर्श शाळा | ( ) | ( ) | ( ) |
| 3. क्रीडा स्पर्धा | ( ) | ( ) | ( ) |
| 4. लोकनृत्य | ( ) | ( ) | ( ) |

(वर अशी खूण करावी.)

चौक क्र.3 आदिवासी विकास विभागाच्या अधिका-यांनी दिलेल्या भेटीचे मूल्यमापन

1. आदिवासी विकास विभागाच्या : होय/नाही
अधिका-यांनी आश्रमशाळेला
भेटी दिल्यात काय ?

2. असल्यास केव्हा

| अ.क्र. | अधिका-याचा हुद्दा | 1989 | | | 1990 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक | दोन | तीन | एक | दोन | तीन |
| 1. | प्रकल्प अधिकारी | | | | | | |
| 2. | आदिवासी विकास अधिकारी | | | | | | |
| 3. | | | | | | | |
| 4. | | | | | | | |
| 5. | | | | | | | |
| 6. | | | | | | | |

3. आदिवासी विकास विभागाच्या अधिका-यांनी शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी काय सूचना/ मार्गदर्शन केले ?

सूचना : 1.

2.

3.

4.

मार्गदर्शन 1.

2.

3.

4.

चौक क्र. 4 वैद्यकिय अधिका-यांनी दिलेल्या भेटीचे मूल्यमापन

1. विविध स्तरावरच्या आरोग्य अधिका-यांनी दिलेल्या भेटी §1990 मधील§

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | दिनांक | तपासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली |
| 1. | जिल्हा स्तरावरील | | | |
| 2. | प्राथमिक आरोग्य केंद्राचे | | | |
| 3. | ए.बी.एम. | | | |

| अ•क्र• | अधिका-याचे नांव | दिनांक | तपासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली |
| 4• | इतर तांत्रिक कर्मचारी | | | |
| 5• | एस•आय• | | | |

2• वैद्यकिय अधिका-यांनी आश्रमशाळेतील मुलांची वार्षिक तपासणी केल्याचा दिनांक –

| साल | दिनांक | दिनांक |
|---|---|---|
| 1986 | 1• | 2• |
| 1987 | 1• | 2• |
| 1988 | 1• | 2• |
| 1989 | 1• | 2• |
| 1990 | 1• | 2• |

3• तपासणी केल्यानंतर सर्वसाधारणपणे कोणते आजार आढळले•

1•
2•
3•

त्यावर कोणते उपाय केले ?

1•
2•
3•

4• औषधोपचाराच्या सूचनांबाबत
मुख्याध्यापकांनी कार्य कार्यवाही केली ?

1•
2•
3•

5• विद्यार्थी आजारी पडल्यानंतरः होय/नाही
वेळोवळी प्राथमिक आरोग्य केंद्राला
सूचना दिली गेली का ?

वैद्यकिय अधिका-यांनी औषधोपचाराच्या
बाबतीत काय कार्यवाही केली ?

1•
2•

वैद्यकिय अधिका-यांनी औषधोपचाराच्या
बाबतीत कार्यवाही केली नसल्यास त्याची
तारीखवार माहिती व आपले मत द्यावे•

1• तारीख

2• तारीख

3• तारीख

6• सूचना दिल्यानंतर लगेचच औषधो-
पचाराची व्यवस्था प्राथमिक आरोग्य
केंद्राकडून केली जात असल्यास त्या
बद्दलचे आपले स्पष्ट मत नमूद करा

1•

2•

7• आश्रमशाळेतील विद्यार्थी आजारी पडल्यामुळे औषधोपचाराकरिता खाजगी दवाखान्यात न्यावे लागले काय ? होय / नाही

8• खाजगी डॉक्टरांकडे न्यावे लागण्याच्या प्रसंगाची माहिती द्या

| अ•क्र• | खाजगी डॉक्टरांकडे नेलेल्या मुलांची संख्या | वर्ष | आजाराचे स्वरुप | खाजगी डॉक्टरांकडे नेण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| 1• | | 1986 | | |
| 2• | | 1987 | | |
| 3• | | 1988 | | |
| 4• | | 1989 | | |
| 5• | | 1990 | | |

9• मुलांना आजर होऊ नये म्हणून केलेल्या सूचना

1•
2•
3•

त्यावर केलेली कार्यवाही

1•
2•
3•

10• मुख्याध्यापकांच्या स्तरावर कार्यवाही न करता येण्याजोग्या सूचना

1•
2•
3•

या बाबतीत आदिवासी विकास अधिकारी
यांच्याकडे केलेले प्रयत्न

1.
2.

आदिवासी विकास अधिकारी यांनी
केलेली कार्यवाही

1.
2.

11. तपासणीनंतर वैद्यकीय अधिका-यांनी
दवाखान्यातून दिलेल्या औषधाचे प्रमाण

1.
2.

व बाहेरून आणावयास सांगितलेल्या
औषधांचे प्रमाण

1.
2.

12. दरमहा वैद्यकिय अधिकारी आश्रम शाळांना भेट देतात काय ? होय/नाही

13. वर्षवार किती मुलांना प्राथमिक
आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले
व किती दिवस ?

| वर्ष | विद्यार्थी संख्या | दिवस | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1 ते 4 | 4 ते 8 | 8 ते 15 | 15 च्या पुढे |
| 1986 | | | | | |
| 1987 | | | | | |
| 1988 | | | | | |
| 1989 | | | | | |
| 1990 | | | | | |

14. आपल्या आश्रमशाळेत विशेष काही आरोग्य कार्यक्रम आरोग्य विभागा-मार्फत राबविले गेले काय ? होय/नाही

15. राबविले गेले असल्यास थोडक्यात तपशील

16. मुख्याध्यापकांकडून वैद्यकिय अधिकारी: यांच्या भेटीचा अहवाल आदिवासी विकास अधिकारी यांना पाठविला जातो काय ? होय/नाही

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

---

शासकीय आश्रमशाळेला वैद्यकिय अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी दिलेल्या भेटीचे मूल्यमापन- 1991-92

प्रपत्र क्र·2

वैद्यकिय अधिका-यांच्या अभिप्रायार्थ प्रश्नावली {विचारधारा}

चौक क्र·1 : प्रास्ताविक

1· वैद्यकिय अधिका-याचे नांव :
मुख्यालय, पत्ता

2· वैद्यकिय अधिका-यांचा स्तर : जिल्हा/तालुका

चौक क्र·2

1· अ· जि·प·/पंचायत समितीच्या आरोग्य विभागात किती वर्षे काम करीत आहात ? : वर्ष ····
ब· कोणत्या पातळीवर : ग्राम/तालुका/जिल्हा/राज्य

2· आश्रमशाळेला नियमितपणे भेटी देता काय ? : होय/नाही

3· वर्षातून किती वेळा ? : एक/दोन/तीन

4· 1990-91 मध्ये दिलेलया भेटी व तपासणीचा तपशील : भेटीचा महिना

5• सर्वसामान्यपणे आश्रमशाळेतील : 1•
विद्यार्थ्यांच्यात कोणती व्याधी : 2•
आढळून येते?

6• विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत आपणास : 1•
काय सूचना सुचवाव्याशा वाटतात ? : 2•

7• विद्यार्थ्यांच्या शारीरीक तपासणी
केल्याची कार्डस् ठेवलीत काय ?

या व्यतिरिक्त काही माहिती द्यावयाची असल्यास

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

शासकीय आश्रमशाळेला शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी दिलेल्या भेटीचे
मूल्यमापन- 1991-92

प्रपत्र-क्र•3

शिक्षण विभागाच्या अभिप्रायार्थ प्रश्नावली {विचारधारा}

चौक क्र•1 प्रास्ताविक

1• शिक्षण विभागातील अधिका-याचे
नांव

हुद्दा/पद

मुख्यालय/पत्ता

चौक क्र•2

1• पंचायत समिती/शिक्षण क्षेत्रात : वर्ष
किती वर्षे काम करीत आहात ?

कोणत्या पातळीवर : ग्राम/तालुका/जिल्हा/राज्य

2• आश्रमशाळेला नियमितपणे भेटी : होय/नाही
देता काय ?

3• वर्षातून किती वेळ : एक/दोन/तीन

4• नियमितपणे भेटी न देण्यात
काय अडचणी येतात ?

1•
2•
3•

5• आश्रमशाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारणे-
साठी आपणास काय सूचना करावयाशा
वाटतात ?

1•
2•

6• शिक्षकांना काय सूचना द्याव्याशा
वाटतात ?

1•
2•
3•

7• क्रिडा विषयक काय सूचना सुचवाव्या
असे वाटते ?

1•
2•
3•

8• वरील व्यतिरिक्त काही बाबी मांडावयाच्या
असल्यास सविस्तरपणे मांडाव्यात

1•
2•
3•